Volume 8 (Special Issue 04)
January, 2018

ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

V.M.S.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

COSMOS
IMPACT FACTOR
4.270

UGC Journal list No. 64768



## Editor : Dr. R. V. Bhole

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No- 23, Mundada Nagar,
Jalgaon(M.S.) 425102
Email – info@jrdrb.com Visit – www.jrdrvb.com

Scanned with CamScanner

ISSN-2230-9578
COSMOS IMPACT FACTOR 4.270

V.M.S's S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

Journal of Research and Development
**Volume 8 (Special Issue 04) January, 2018**

# INDEX



| अ. क्र. | पेपरचे नांव | लेखकाचे नांव | पेज नंबर |
|---|---|---|---|
| १ | Dr. Babasaheb Ambedkar Views on Agrarian Issues | Dr. Sandesh wagh, Asso. Prof.Dept.History, University of Mumbai, Mumbai | १ |
| २ | भारतीय कृषी सद्य:स्थिती, अव्हाणे व उपाय | डॉ.सुभाष पाटील, एस.एन.डी.टी.महीला विद्यापीठ पुणे | ६ |
| ३ | खानदेशातील प्राचिन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील कृषी विकासाचा तुलनात्मक अभ्यास | डॉ.पी.एस.सोनवणे, साक्री | १३ |
| ४ | साहित्याची कृषी व ग्रामीण विकासातील भूमिका | प्रा.डॉ.वसुमती पुंडलीकराव पाटील, विमलबाई महाविद्यालय साक्री | १७ |
| ५ | उस पिकांसाठी उसाभोवती सिंचन पध्दती आणि कृषी विकास | प्रा.डॉ.एम.एम.सैंदाणे, सि.गो. पाटील महाविद्यालय साक्री | २० |
| ६ | ग्रामीण विकासात शेतमाल प्रक्रिया उद्योगाची भूमिका | डॉ.सुधाकर एल.जाधव, आदर्श महाविद्यालय निजामपुर | २३ |
| ७ | बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातील ग्रामीण व कृषी समाजदर्शन | प्रा.मिलिंद देवरे, आर.डी.देवरे महाविद्यालय म्हसदी | २५ |
| ८ | शेतकरी आत्महत्याची कारण मिमांसा | प्रा.ज्ञानेश्वर काशिनाथ भामरे, कला विज्ञान महाविद्यालय नगांव | ३० |
| ९ | मराठी साहित्यातील ग्रामीण व कृषी संवेदना | डॉ.हेमराज बिरारीस, उ.पा. महाविद्यालय दहिवेल | ३४ |
| १० | गोतावळा: स्वातंत्र्योत्तर काळातील बदलत्या कृषी व ग्रामीण वास्तवाचे चित्रणरंगवणारी कादंबरी | डॉ.प्रकाश श्रीराम साळुंके, सि.गो. पाटील महाविद्यालय साक्री. | ३६ |
| ११ | ब्रिटीश कालीन कृषी विषयक धोरण | प्रा.डॉ.संजय यशवंत गवळी, उ. पा. महाविद्यालय दहिवेल | ३८ |



Scanned with CamScanner

# गोतावळा : स्वातंत्र्योत्तर काळातील बदलत्या कृषी व ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणारी कादंबरी.

डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके, सी.गो.पाटील. महाविद्यालय, साक्री

V.M.s' S. G. Patil Arts, Sci. ... College, SAKRI, Dist.Dhule

**प्रास्ताविक :**

१९६० नंतर ग्रामीण लेखकांची नवी पिढी उदयास आली. उद्धव शेवाळे, रा. रं. बोराडे, डॉ. आनंद यादव, डॉ. मधु मंगेश कर्णीक, महादेव मोरे, ना. धों. महानोर आदि लेखकांनी महाराष्ट्राच्या विविध भागातील ग्रामीण जीवन शब्दांकीत केले आहे. आनंद यादव यांनी कादंबरीतील निवेदनासाठी ग्रामीण बोलिचाच अवलंब करून तीची अविष्कार क्षमता वाढवली आणि, 'गोतावळा' या कादंबरीतून स्वातंत्र्योत्तर काळातील बदलत्या ग्रामीण वास्तवाला हात घातला.

डॉ. आनंद यादव यांची अनेक अर्थांनी गाजलेली 'गोतावळा' ही पहिलीच कादंबरी आहे. या कादंबरीने मराठी व ग्रामीण कादंबरीला नवे परिणाम प्राप्त करून दिले. १९६० नंतर शेतीवरती यांत्रिकीकरणाचा जो परिणाम झाला त्यामुळे जुन्या पारंपरिक संस्कृतीची हारवलेली मूल्य आणि नव्या यांत्रिकीकरणाने माणासाच्या संबंधापेक्षा रुक्ष व्यवहाराकडे झुकलेली व्यवस्था या कादंबरीत आनंद यादव यांनी अतिशय तरल संवेदनशिलतेने मांडली आहे. ग्रामीण माती आणि ग्रामीण संस्कृती यांचे सखोल प्रतिबींब या कादंबरीत पडलेले दिसते. शेती मातीत अव्याहतपणे राबवणारा सर्वसामान्य माणूस नारबा हा या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. शेती हा त्याचा अंत्यत जिव्हाळ्याचा विषय आहे. त्या शेतीत तो सतत राबराब राबतो. मात्र त्याचा मालक त्याच्या कामविषयक भावनांची कोंडी करतो. नारबाचे लग्न आज करतो उद्या करतो असे करत नारबाची जवानी मातीतच जाते. आधुनिक यंत्रसामुग्रीमुळे शेतातलेही त्याचे भावविश्व उखडले जाते. त्याच्या जिवनाची शोकांतीका होते. बदलत्या वास्तवाचे चित्रण त्यातून अंत्यत नेमकेपणाने व्यक्त होते. त्याचबरोबर या कादंबरीला कलात्मकतेची जी उंची लाभलेली आहे. त्यामुळे या कादंबरीने मराठी साहित्य विश्वात खळबळ मांजवून दिली आहे. गोतावळामधुन विविधांगी दर्शन आपल्याला दिसते. प्राणीसृष्टीचे अनोखे दर्शन घडवितांनाच ते ग्रामीण जिवनावर आलेल यंत्रसंस्कृतीचे सावटही दाखवतात. कृषीसंस्कृतीचे दर्शन घडवतांना कादंबरीचा नायक हा शेतमजूर दाखवतात. त्या नायकाच्या मनात माजणारी खळबळ मानसशास्त्रीय दृष्ट्रीने मांडतात. मातीशी त्याचे जिव्हाळ्याचे नाते आहे. माती त्यातून निघणारी पिके, निसर्गाची बदलती रूपे आणि गुरेढोरे यांच्याशी नारबाचे जवळचे नाते आहे. गोतावळा कादंबरीच्या निवेदनात कमालीची सहजता आणि नैसर्गिकता आहे. भावस्पर्शी आणि उत्कट संवादामुळे तिला अधिक जिवंतपणा लाभला आहे. कोल्हापुरच्या ग्रामीण भागातील ग्रामीण बोलीचा सहज आविष्कार तिच्यात आलेला आहे. वास्तववादी जीवनचित्रण हे या कादंबरीचे बलस्थान आहे. आधुनिकीकरणाने ऱ्हास पावणाऱ्या ग्रामीण संस्कृतिचे विदारक चित्रण या कादंबरीत केलेले आहे.

**गोतावळा कादंबरीतील सास्कृतिक संघर्ष :**

गोतावळा कादंबरीत पारंपरिक संस्कृती आणि आधुनिक यंत्रयुग यांच्यातील संघर्षाचे चित्रण केलेले आहे. पारंपरिक संस्कृतीचे प्रतिनिधीत्व या कांदबरीतून नायक नारबा करतो. शेतमळ्यातील प्रणीविश्वाचा गोतावळा हा नारबाचा जिवाभावाचा सोबती आहे. इथे चालणाऱ्या जिवनाला एक सांस्कृतिक वारसा आहे. जी या संस्कृतीत बैलांच्या खांद्यावरती शेती संस्कृती जोपासली जात होती. वर्षभर शेतात कष्ट करणाऱ्या बैलांची पोळ्याच्या दिवशी देव म्हणून पूजा केली जाते. त्यांना गोडधोड खाऊ घातले जाते. नेहमी चालणारी मळ्यातील विहीरीवरील मोट, तिच्यामुळे हिरवेगार असलेले मळे पाखरांच्या किलबिलाटाने आळवलेले सुर असायचे. गायी-म्हशींनी, रेड्या-बैलांनी, बकऱ्यांनी गोठे भरलेले असायचे. कोंबड्यांचा, कुत्र्या-मांजरांचा घरातून सर्रास वावर होता. माणसांच्या कामाला किंमत होती. भावनिक नात्याला अर्थ होता. याच साऱ्या विश्वाशी नारबा केंद्रीभुत होता. तो आपल्या भाव भावना, विकार-वासना, याचे साम्य प्राणीसृष्टीमध्येच शोधायचा. त्यांच्याशीच तो संवाद साधायचा.

कोल्हापूरचा पाहुना रामू सोनवडे नारबाच्या मालकाकडे येतो व आधुनिक शेतीच्या सहाय्याने आपल्याला अधिक फायदा होत असल्याचे सांगून ट्रॅक्टर घेण्यास प्रवृत्त करतो. त्यामुळे शेतीकडे पाहण्याची त्याची दृष्टी बदलते. त्याला ट्रॅक्टर घ्यायचा असतो. म्हणून तो व्यवहारवादी बनतो. आपल्याकडे असलेल्या प्रत्येक गोष्टीचा पैसा कसा करता येईल त्याचा प्रयत्न करतो. गोठ्यातील ऐक-ऐक जनावर विक्रीला काढतो. टिक्की म्हैस विकतांना नारबाचे मन गलबलून येते. रेडं विकून टाकलं, थोरली बैलही विकली, गायीपासून काही उपयोग होत नाही म्हणून तीला पांजरपोळात नेऊन सोडली. म्हालिंग्या बैलाचे मरण जवळ आल्यावरही मालकाने त्याला महारांना पन्नास रुपयाला विकला. बेगुमान वागणारा कोंबडा

Scanned with CamScanner

Volume 8 (Special Issue 06) Feb. 2018 ISSN-No. 2230-9578


# Journal of Research and Development

## A Multidisciplinary International Level Referred Journal

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist. Dhule

COSMOS IMPACT FACTOR 4.270

UGC Approved Journal
ज्ञान-विज्ञान विमुक्तये
UGC
No. 64768



Editor - Dr. R. V. Bhole

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International level Referred Journal

COSMOS
IMPACT FACTOR
4.270

V.V.M.S.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

UGC Journal list no. 64768

Multidisciplinary National Conference

On

"***Business Opportunities for the Tribals of India***" on 2nd Feb. 2018.

Special Issue: Volume 8 Issue 6 Feb. 2018

ISSN-No. 2230-9578

## Editor: Dr. R. V. Bhole

## Editorial Board Special Issue

1. **Dr. W. B. Shrisath** (Chief editor, Pimpalner)
2. **Prof. Dr. B. C. More** (Pimpalner)
3. **Dr. S. S. Patole** (Sakri)
4. **Dr. R. K. Petare** (Pimpalner)
5. **Prof. Dr. A. B. Sawant** (Malegaon)
6. **Dr. S. C. Ahire** (Dahiwel)
7. **Prof. K. D. Kadam** (Pimpalner)
8. **Prof. S. K. Kakad** (Pimpalner)
9. **Prof. S. P. Khodake** (Pimpalner)
10. **Dr. S. V. Ahire** (Pune)

**'Ravichandram'** Survey No. – 101/1, Plot No. 23, Mundada Nagar,

Jalgaon (M.S.) 425102

Email-info@jrdrvb.com Visit-www.jrdrvb.com

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist. Dhule



| | | | |
|---|---|---|---|
| 32 | English language learning in economically under privileged children of tribals | Shaikh, B. M. | 153 |
| 33 | Rural market in India | Amrutkar, J.P. and Joshi S.V. | 156 |
| 34 | Socio-economic development in Kan Basin in Dhule District (M.S.) India | Ahire Suresh. C. | 160 |
| 35 | Automation of Libraries | Chaudhari, A. M. | 165 |
| 36 | Study about impact of ecotourism in tribal area | Nerkar, Dipak D. | 167 |
| 37 | Study of the geographical perspective of flood affected settlement in Nandurbar Tehsil | | 170 |
| 38 | Phytochemical investigations of *Ischaemum Pilosum* (Klein.Ex Willd.), for revealing medicinal properties with spectroscopic and chromatographic techniques | Patil M. B. and Khan P. A. | 176 |
| 39 | Toxicity effect of Thiamethoxam and Diafenthiuron on Land Snail, *Macrochlamys indica* | Wankhedkar, Prakash T., Wankhedkar, Smita P., Patel, Nisar G. and Giri, Niranjan R. | 177 |
| 40 | राज्यघटना आणि आदिवासींचे हक्क | जाधव दिनेश भिमराव आणि वसावे कृष्णा नंद्रया | १७८ |
| 41 | अक्कलकुवा तालुक्यातील पावरा आदिवासी जमातीचे सांस्कृतिक दर्शन घडवणारा उत्सव : होलीकोत्सव | साळुंके प्रकाश श्रीराम, सी.गो.पाटील महाविद्यालय साक्री, ता. साक्री, जि. धुळे | १८२ |
| 42 | आदिवासी स्वयंपुर्णतेकडे देशबंधु आणि मंजु गुप्ता फाउंडेशनचे योगदान | सावळे प्रदिप मुरलीधर आणि घरटे चंद्रकांत नथ्थु | १८५ |
| 43 | धुळे जिल्ह्यातील आदिवासी आणि पायाभूत सेवा सुविधांचे एक विश्लेषन | तोरवणे संजय नामदेवराव | १८९ |
| 44 | पश्चिम पट्ट्यातील कोकणी समाजातील डोंगऱ्यादेव (माऊल्या) उत्सवाचा चिकित्सक अभ्यास | गवळी लोटन जगन्नाथ | १९३ |
| 45 | पर्यावरणाचा -हास व शाश्वत विकास | वैशाली रा. हजारे | १९६ |
| 46 | आदिवासींचा सांस्कृतिक कौशल्यातुन आर्थिक विकास | मस्के सतीश श्रीराम आणि बळसाने एम. व्ही. | १९८ |

# अक्कलकुवा तालुक्यातील पावरा आदिवासी जमातीचे सांस्कृतिक दर्शन घडवणारा उत्सवः होलीकोत्सव

डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके
सी.गो.पाटील महाविद्यालय साक्री, ता. साक्री जि, धुळे

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

## प्रस्तावना :-

अक्कलकुवा तालुक्यातील पावरा आदिवासी जमातीची खास वैशिष्ट्येपूर्ण अशी आदिम परंपरेशी नाते सांगणारी संस्कृती आहे. ते ज्या पहाड-पर्वतात राहतात. तेथील पर्यावरणाशी त्यांचे जीवन निगडीत आहे. शतकानुशतकापासून ही जमात निसर्गसन्मुख जीवन जगत आहे. म्हणजे त्यांचे जीवन पध्दती पारंपरिक निसर्गपूजक आहे. अन्न, वस्त्र व निवाऱ्याच्या प्राथमिक आणि मर्यादित गरजा भागवणारी ही जमात आर्थिक दृष्ट्या कमकुवत असली तरी सांस्कृतिक दृष्ट्या अतिशय संपन्न व समृध्द आहे. सांस्कृतिक विविधता आणि संपन्नता यांचा विचार करता राना-वनाच्या आश्रयाने आपल्याच अनोख्या मस्तीत जीवन जगणाऱ्या पावरा आदिवासी जमातीच्या लोकांनी आपले सांस्कृतीक वैभव आजही आबाधीत ठेवले आहे.

आदिवासी पावरा जमातीत विविध सण-उत्सवांना व पूजाविधींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यातून त्यांच्या आदिम संस्कृतीचे आगळे-वेगळे दर्शन घडते. ते राहत असलेल्या पर्यावरणातील ऋतुंचे बदलते रंग आणि त्यातील अद्‌भूत चमत्कार ते कायम अनुभवत असल्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या मानसिक जडण-घडणीवर झालेला आहे. त्यांचे सण-उत्सव विविध श्रध्दा-समजूतींवर आधारलेले असल्यामुळे त्या श्रध्दा समजूतीपोटी म्हणा किंवा त्यांच्यातील भितीपोटी म्हणा ते निसर्गसृष्टीतील विविध चमत्कारांना मनोभावे पूजत असतात. त्यांच्या सण-उत्सवांचे व पूजाविधींचे स्वरूप सार्वजनिक व सामुहिक असल्यामुळे त्यांच्यात सामुहिक आनंदाचे वातावरण निर्माण होत असते. गावकरी व नातेवाईक यांच्या भेटीगाठी होत असतात. परिणामी एकमेकांच्या विचारांचे आदान-प्रदान होत असते. खुशलक्षेम कळत असते. त्या निमित्ताने सामुहिक भोजनाचा आनंद घेतला जातो. आदिवासींच्या सण-उत्सवांच्या बाबतीत श्री. विरसिंग पाडवी यांनी 'आदिवासी जीवन संघर्ष' या लेख संग्रहात म्हटले आहे की, "आदिवासींच्या सण-उत्सवांच्या सार्वजनिक कार्यक्रमामुळे विखुरलेला आदिवासी समाज एकत्र येतो. माणसे व मने जोडली जातात. त्यामुळे सामाजिक विकास घडायला मदत होते आणि सामाजिक मूल्ये देखील जोपासली जातात व आपली ओळख कायम राहते." डॉ. म. सु. पगारे पावरांच्या सण-उत्सवांच्या बाबतीत म्हणतात, "सण-उत्सव लोकांना एकत्र आणून मनोमिलन घडवितात. लोकांमध्ये आनंद निर्माण करतात प्रत्येक घरात गोडधोड पदार्थ केले जातात नातेवाईकांना बोलावतात. घरातल्या मंडळींना नवे कपडे घेतात सण-उत्सवाच्या निमित्ताने घरातील सर्वांनी एकत्र येऊन नातेवाईकांसहित आनंद उपभोगण्याची संकल्पना रूढ आहे. सर्व एकत्र आल्यावर जो शाब्दीक आविष्कार होतो त्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. या लोक संस्कृतीतून त्यांच्या रूढी-परंपरा, आचार-विचार, विधी-संकेत यांचेही दर्शन घडते." आदिवासी पावरांचे अभ्यासक श्री. डी.जी.पाटील म्हणतात "पावरा लोकांचे सण-उत्सव त्यांच्या सांस्कृतिक जीवनाचे खास वैशिष्ट्यपूर्ण अंग आहेत. त्यात त्यांच्या आदिवासी जीवनाच्या रूढी-परंपरांचे दर्शन होते." आदिवासी साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. गोविंद गारे यांनी आदिवासींच्या सण-उत्सव व पूजाविधीच्या बाबतीत म्हटले आहे की, "आदिवासी भिल्ल समाजातील सण-उत्सव आणि पूजाविधीचे स्वरूप निसर्गातील सचेतन शक्तींशी, नवनिर्मितीशी आणि माणसांचे दैनंदिन जीवन सुसह्य करण्याच्या प्रक्रियेशी परंपरेने बांधलेले आहे." वरिल अभ्यासकांच्या मत-मतात्तरातून असे म्हणावेसे वाटते की आदिवासी पावरांच्या विविध सण-उत्सवातून त्यांच्या लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

आदिवासी पावरांच्या सण-उत्सवात, पूजाविधीत मोहफुलाच्या मध्याला व बळीप्रथेला आगळे वेगळे महत्त्व असल्यामुळे त्यांचे कोणतेच सण-उत्सव, पूजाविधी मद्याविना व बकऱ्या-कोंबड्यांच्या बळीविना पार



Scanned with CamScanner

गोवऱ्या ठेवुन त्यांना कच्चे सूत गुंढाळतात त्याला 'दांडा मेकणू' असे म्हणतात. होळी साठी लागणाऱ्या बांबूलाही सूत बांधतात. होळीच्या दिवशी होळीसाठी लागणारा बांबू जमिनीतून मुळासकट काढतात व होळीच्या ठिकाणी आणतात. त्याच्या शेंड्याला खोबऱ्याच्या वाट्या, पापड, पळसाची फुले, सफेद ध्वज लावून खड्यात गाडतात. आजूबाजूला लाकड व गोरऱ्या टाकतात. तो पर्यंत होळीची मानता असणाऱ्या विविध सोंगाना सजवतात. गावातील लहान-थोर, स्त्री-पूरूष दारू पेऊन ढोल वाजवून एका तालासुरात होळीभोवती घेर धरून नाचतात. त्याला 'गेरनृत्य' असे म्हणतात.

पहाटे चार-पाच वाजता गावपाटील व पूजारा दोघे होळीची पूजा करतात व होळी पेटवतात. ती पेटती होळी पुव दिशेला पडल्यास शुभ मानतात. होळीचा जळालेला बांबू खाली ठेवल्यानंतर होळीची शेंडी प्रथम गावपाटील धाऱ्याच्या किंवा विळ्याच्या सहाय्याने एकाच घावात तोडतो. नंतर पूजारी तोडतो. नंतर गावातील इतर लोक तोडतात व होळी मातेला पुजून नैवद्य देतात. होळी मातेला नारळ अर्पण करतात व नमस्कार करून तिची रक्षा कपाळाला लावतात आणि घरीही घेऊन येतात. कुणाला उन्हाची झळ लागल्यास किंवा भूतबाधा झाल्यास त्याला ती रक्षा लावण्यासाठी उपयोगी पडते असे सांगतात.

होळीच्या दुसऱ्या दिवशी मेलादा भरवला जातो. या कार्यक्रमात पटांगणात आयताकृती खड्डा खोदून त्यात लाकडं जाळून निखारा करतात व पेटलेल्या निखाऱ्यावर गावपाटील आणि पूजारा चालतात. चालतांना मात्र होळी मातेच्या कृपेने त्यांना कोणतीच इजा होत नसल्याचे सांगतात एवढी त्यांची श्रध्दा आहे. या कार्यक्रमासही लोक ढोल पावरीवर नाचगाणे करतात. नंतर दुसऱ्या दिवसापासून पाच दिवस होळीची मानता मानलेल्या लोकांनी विविध सोंगे तयार करून गावोगावी जावून नाचतात. तेव्हा गावातील श्रध्दाळू लोकं त्यांना ऐपतीप्रमाणे पैसे, धान्य, दारू आणि कोंबडेही दान म्हणून देतात. पाच दिवसानंतर नदीवर जावून अंघोळ करतात व मिळालेल्या दानाचा प्रसाद म्हणून सेवन करतात तेव्हा त्यांचा नवस फिटल्याचे समजातात.

होळीनंतर पाचव्या दिवशी सकाळी होळीची राख घेऊन घरोघरी फिरतात दिसेल त्याला लावतात हीच त्यांची रंगपंचमी होय. दानाच्या मिळालेल्या पैशांनी कोंबडे विकत घेतात व होळी जाळलेल्या ठिकाणी त्या कोंबड्याचा बळी देऊन तीथेच जेवण करतात. यालाच 'गोटखाणे' असे म्हणतात.

अशा प्रकारे पंधरा दिवस चालणाऱ्या 'होळी' या सणाला आदिवासी पावरा समाजात अनमोल असे महत्त्व आहे. या सणातून खऱ्या अर्थाने त्यांची निसर्ग संस्कृती प्रत्ययाला येते.

**सारांश :-**

निसर्गाशी पूर्णपणे समरस झालेल्या पावरा आदिवासींचा निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा, समुह शक्ती-भक्तीचा आगळा वेगळा आविष्कार दाखवणारा, शतकानुशतकांच्या पारंपरिक संस्कृतीचा समृध्द वारसा स्वतःतून जतन करणारा, जगण्याची प्रेरणा देणारा, गावातली इडा-पीडा नष्ट करून सुखसमृध्दी देणारा, सर्वांना एकत्रीत आणणारा, सर्वांचा आनंद आणि उत्साह व्दिगुणीत करणारा, महिन्याआधी सुरू होऊन होळीनंतरही आठवडाभर चालणारा हा होलिकोत्सव म्हणजे आदिवासी पावरा बांधवांचा खऱ्या अर्थाने सांस्कृतीक उत्सव होय. सामुहिकतेने साजरा केला जाणारा, निसर्गाशी नाते सांगणारा, पर्यावरणपूरक व मानवतेचे दर्शन घडवणारा हा सण त्यांच्या सांस्कृतीक जीवणाचे खास वैशिष्ट्येपुर्ण असा सण होय. या सणातून त्यांच्या लोकसंस्कृतीचे खरे दर्शन घडते.

**संदर्भसूची :-**

१) श्री. बिरसिंग पाडवी :- आदिवासी जीवन संघर्ष
२) डॉ. म. सु. पगारे :- पावरा लोकगीतातील लोकसंस्कृती, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव.
३) डी. जी. पाटील :- पावरा समाज व संस्कृती, भाषा संशोधन प्रकाशन केंद्र बडोदा.
४) डॉ. गोविंद गारे :- सातपुड्यातील भिल्ल-ऐतिहासिक सामाजिक मागोवा, कॉन्टिनेंन्टल प्रकाशन पुणे.
5) श्री. सुभाष पावरा :- सातपुडान सानिध्यामाय आदिवासी पावरा संस्कृती, भाषा संशोधन प्रकाशन केंद्र बडोदा.

V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.



Scanned with CamScanner

PSS 2018

Impact Factor – 6.261 Special Issue - 76 Dec. 2018 ISSN – 2348-7143


INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

# HISTORY OF KHANDESH

## खानदेशचा इतिहास



V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

■ GUEST EDITOR ■
Dr. Vijay Y. Jadhav

■ EXECUTIVE EDITOR ■
Prof. Satish M. Borse

■ CHIEF EDITOR ■
Mr. Dhanraj T. Dhangar

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

V.V.M.s S. G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

## INDEX


| No. | Title of the Paper Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| १ | खानदेश के आर्थिक एवं सांस्कृतिक विकास में फारुकी सुल्तानों का योगदान<br>प्रो. जे.सी. उपाध्याय | ११ |
| २ | साने गुरुजींच्या सामाजिक सुधारणा विषयी असलेल्या दृष्टीकोनाचा चिकित्सक अभ्यास<br>प्रा. अवित रघुनाथ पाटील, डॉ. डी.एन. वाघ | १५ |
| ३ | शाहूराजांची सुटका व त्यांना खानदेशमधून मदत<br>प्रा. अनिल विठ्ठल बाविस्कर | १७ |
| ४ | मराठ्यांचा गुजरात प्रांतातील सत्ता विस्तार आणि पेशव्यांचे राजकारण<br>प्रा.डॉ. शरद कौतिक भामरे | २० |
| ५ | चित्रकलेचे उपयोजन व जातकचित्र<br>आबासाहेब माणिकराव देशमुख, डॉ.पी.डी. जगताप | २५ |
| ६ | पश्चिम खानदेशातल्या साक्री तालुक्यातील सण–उत्सव व त्यासंबंधीची अहिराणी बोलीतील ओवीगीते<br>प्रा.डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके | २८ |
| ७ | प्राचिन, मध्ययुगीन व पेशवेकालीन खानदेशातील राजकिय परिस्थिती<br>प्राचार्य डॉ. पी.एस. सोनवणे | ३२ |
| ८ | अहिराणी बोलीचा इतिहास<br>प्रा.डॉ. सुधाकर सीताराम चौधरी | ३५ |
| ९ | पूर्व खान्देशातील स्वराज्य पक्षाचे योगदान<br>प्रा.डॉ. बाळकृष्ण त्र्यंबक पाटील | ३९ |
| १० | खानदेशातील बंजारा स्त्रियांची परिस्थिती<br>डॉ. डी.डी. राठोड | ४१ |
| ११ | खानदेशात एकोणिसाव्या शतकातील औषधी तेल तयार करण्याचे उद्योगधंदे<br>प्रा.डॉ. भामरे नानाजी दगा | ४४ |
| १२ | खानदेशातील सण आणि उत्सव : विशेष संदर्भ बंजारा समाज<br>प्रा.डॉ. सुनिल भालेराव पाटील | ४८ |
| १३ | खानदेशातील आदिवासी जमातीची सांस्कृतिक परिस्थिती<br>प्रा.डॉ. योगेश जगन्नाथ कोरडे | ५२ |
| १४ | खानदेशातील सवाई मुकटी गावातील स्वातंत्र्य सेनानींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान<br>प्रा. गोकुळ निंबा पाटील | ५६ |
| १५ | खानदेशातील लोकसाहित्याचे विश्लेषणात्मक अवलोकन<br>प्रा. राजकुमार ज्ञानोबा चाटे | ५८ |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 76 : History of Khandesh
ISSN : 2348-7143
Dec. 2018

# पश्चिम खानदेशातल्या साक्री तालुक्यातील सण-उत्सव व त्यासंबंधीची अहिराणी बोलीतील ओवीगीते

प्रा.डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके
सी.गो. पाटील महाविद्यालय,
साक्री, ता. साक्री, जि. धुळे.

V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

**प्रस्तावना**

खानदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषेला 'अहिराणी' या नावाने ओळखले जाते. अहिराणी ही खानदेशातील कष्टकरी लोकांची मायबोली आहे. ती सहित्याच्या सर्व अंगांनी समृध्द आहे. अहिराणी बोलीत विपुल असे लोकसाहित्य सामावलेले आहे. अहिराणी लोकसाहित्याचा उगम विविध सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीतून झालेला आहे. अहिराणी बोलीभाषेत मौखिक परंपरेने लोकगीते, लोककथा, म्हणी, वाकप्रचार, उखाणे यांचा जन्म होत राहिला व मानवी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत हा साहित्याचा ठेवा संक्रमीत होत राहीला. अहिराणी लोकांचे सहित्य देव- देवता, सण-उत्सव, रुढी-परंपरा यांच्या अनुषंगाने निर्माण होत राहिले. या साहित्याचा निर्माता कोणीएक असला तरी त्याला प्रातिनिधीक समजून समुहाचा शिक्का असल्यामुळे समुहाचे सहित्य म्हणून अहिराणी लोकसाहित्याचा उल्लेख करता येतो.

अहिराणी ओवीगीते रुढी परंपरेतून अविष्कृत झालेली आहेत. ही ओवीगीते जशी लोकदैवतांची आहेत तशीच लोकसण- उत्सवांच्या संबंधीचीही आहेत. कारण खानदेशात अनेक सण- उत्सव मोठया प्रमाणात साजरे केले जातात. त्या सण -उत्सवांमधूनच खानदेशची सांस्कृतिक जडण- घडण झालेली आहे. हया सण-उत्सवांच्या वेळी आजही खानदेशात विविध लोकगीते-ओवीगीते म्हटली जातात. कारण ही ओवीगीते मानवी जीवनाच्या तालासुरांशी नातं जोडणारी आहेत. या ओवीगीतांनी विविध प्रकारचे अलंकार, रस, छंद, गंध, अर्थ त्यालेला आहे. त्यामुळे अहिराणी ओवीगीतांमध्ये एकप्रकारची गोडी असून त्यात प्रेम, जिव्हाळा, निर्मळपणा, विचार, भाव- भावना निर्व्याजता असे अनेक गुण ओतप्रोत भरलेले आहेत. अहिराणी ओव्या म्हणजे खानदेशातील स्त्रीच्या मुखातून हदयाच्या गाभाऱ्यातील निघणारे भावमयी शब्द होत. हे शब्द विविध सण-उत्सवांच्या प्रसंगी आजही खानदेशातील स्त्रीच्या मुखातून आपोआपच ओवीरुपाने बाहेर पडत असतात.

**खानदेशातील सण-उत्सव**

खानदेशी जनता ही मुळातच देवभोळी व उत्सवप्रिय आहे.खानदेशात विविध सण- उत्सव मोठया प्रमाणात आनंदाणे व एकदिलाने साजरे केले जातात. त्यातूनच खानदेशच्या संस्कृतीचे प्रतिबिंब उमटलेले आहे. माणूस समाजशील प्राणी आहे. चाकोरीबध्द जीवन जगत असतांना सर्वांना एकत्र येता यावं, थोड वेगळं जीवन जगता यावं, मन प्रसन्न, उत्साहीत व्हावं जगण्यासाठी नवी उर्जा मिळावी म्हणून वर्षभराच्या कालावधीत गुढीपाडव्या पासून तर थेट होळीपर्यंत विविध उत्सावांची निर्मिती करण्यात आलेली आहे. या सण-उत्सावांच्या निमित्ताणे देखील विविध अहिराणी लोकगीतांची निर्मिती झालेली आहे. त्यात अक्षयतृतियेची गौराईची, गुलाबाईची, कानुबाईची, दिवाळी दसऱ्याची व पोळा सणांची ओवीगीते आढळून येतात. काही सण -उत्सावांची माहिती व त्यासंबंधीची ओवीगीते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**अक्षयतृतीया**

हा खानदेशातील महत्वाचा सण आहे. साडेतीन शुभ मुहुर्तांपैकी हा एक शुभ मुहुर्त मानला जातो. वैशाख शुदध् तृतीयेला हा सण येत असतो. या सणाला खानदेशातील स्त्रियांचे लोकदैवत असलेल्या गौराईची पूजा केली जाते. चैत्र महिण्याच्या चावदसला खानदेशात घरोघरी गौराईची मांडणी केली जाते. गौराई हे पार्वतीचे रुप मानले जाते सासुरवाशिनीला माहेरचे सुख , आनंद देणारी ही देवता आहे. या सणाच्या निमित्ताने सासुरवाशीण मुली माहेरी येतात. हा सण सासुरवाशीनीला प्रिय असतो. चैत्र पौर्णिमेपासून ते अक्षयतृतीया पर्यंत मुली व माहेवाशिनी झोक्यावर बसून गौराईची गाणी म्हणतात. फुगडया खेळतात. टिपऱ्या खेळतात. आखाजी सारखा सन-सन मना टिपरा खेयानां असे म्हणत आखजी सणाचे गाणे गातात. खानदेशात अहिराणी बोलीभाषेत गौराईची गाणी विशेष प्रसिदध् आहेत जसे.-

*चैत्र वैशाखनं ऊनं व माय वैशाखनं ऊनं*
*खडक तापी झायात लाल व माय तापी झायात लाल*
*गौराईना पायले वनात फोड व माय पायले वनात फोडं*
*संकर निंघना घोडयावर व माय निंघना घोडयावर*
*मायले ठेवं फुलेस्वर व माय ठेवं फुलेस्वर*

आखाजीच्या सणाच्यावेळी सगळीकडे आनंदी आनंद आहे. अशा वातावरणात टिपऱ्या खेळण्यासाठी सासुरवाशीन आपल्या नातेवाईक स्त्रियांकडे विविध दागदागिन्यांची मागणी करीत आहे. अशा आशयाचे गाणे पुढील प्रमाणे-

कारण पोळा ह्या सणानंतरच सर्व सणांना सुरुवात होते कृषीसंस्कृतीशी तो सण निगडीत आहे व शेती कामासाठी लागणारे बैल हे शेतकऱ्याचे दैवत आहेत त्या बैलांना पूजण्यासाठी वर्षातून एकदा कामातून विसावा देण्यासाठी 'बैलपोळा' हा सण साजरा केला जातो. बैल हा खऱ्या अर्थाने शेतकऱ्याचा आसरा असतो तो वर्षभर शेतात राब -राब राबतो म्हणून पोळयाच्या दिवशी त्याची देव म्हणून पूजा करुन त्याला गोडधोड असा पुरणपोळीचा नैवद्य खायला घालून त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली जाते असा आशय पुढील ओवींतून व्यक्त होतो.-

*पोया पोया करु बैल कुनबीना आसरा*
*नंदीले ववायले, सन नहीना दुसरा*
*आज पोयानावं सन ,सासू पोटले कायीमायी*
*धवया पवया आज तुमले , कयी पुरननी पोयी*

वरील सणांप्रमाणेच गुढीपाडवा, गणपती, मकरसंक्रात, होळी आदि सणही खानदेशात साजरे केले जातात व त्या सणांचीही गाणी म्हटली जातात.

अशा प्रकारे खानदेशात विविध सण-उत्सव अतिशय मनोभावे साजरे केले जातात व अहिराणी बोलीतील ओवीगीतातुन त्या सण-उत्सवा बद्दलची महती सांगीतली जाते त्यातून खरोखरच खानदेशची अहिराणी संस्कृती आपल्या दृष्टीस येते.

**दसरा सण**

दसरा हा सण खानदेशातला अतिशय आनंदाचा सण असतो दसऱ्याच्या आधी दहा दिवस देवांच्या रुपाने घट बसवले जातात व ते दसऱ्याच्या दिवशी उठवले जातात. दारात सडा- रांगोळी घातली जाते. खायला गोडधोड खानदेशचा खास आवडता मेनू पुरणपोळीचा स्वयंपाक केला जातो. संध्याकाळी सर्वगावकरी मिळून सिमोल्लंघन करतात. रात्री घरोघरी एकमेकाच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून आपटयांची पाणे (त्या पानांना त्या दिवशी सोने म्हणतात ) वाटले जाते तेव्हा आपल्यापेक्षा मोठयांचा पाया पडून त्यांचा आशीर्वाद घेतला जातो. त्या दिवशी सर्व लहान थोर मंडळी आनंदी असतात म्हणूनच त्या दिवशी, 'दसरा सण मोठा नाही आनंदाचा तोटा' असे म्हटले जाते व त्याचा प्रत्येय सर्वांना येत असतो त्या आशयाच्या अहिराणी ओव्या पुढील प्रमाणे-

*आज दसरा दसरा आज सन सिलांगन*
*दारी घाला वं रांगोया, सकाथे सारा व आंगन*
*आज दसरा दसरा ,लुटा जिवशीना तोटा*
*मोठलास्ना पडा पाय, धाकलास्ले भेटे घाटा*

**दिवाळी उत्सव**

दिवाळीचा सणोत्सव हा खानदेशातला ५-६ दिवस चालणारा ( वसुबारस पासून ते भाऊबीजपर्यं ते) मोठा सणोत्सव असतो. हा सण सासुरवाशिणींचा अतिशय प्रिय सण असतो. या सणाच्या निमित्ताणे माहेरचा सहवास तीला अधिक लाभतो. हा सण जवळ आला म्हणजे सासुरवाशीण बहिण आपल्याला घ्यायला येणाऱ्या भावाची आतुरतेने वाट पाहत असते तीला माहेरी जाण्याची फार हुरहुर लागलेली असते. म्हणून ती आपल्या भावाची दररोज वाट पाहत असते ती म्हणते-

*दसरापासीन दिवायी ईस रोज*
*मना बंधुनी वाट दखस मी रोज,*

बहिणीला घ्यायला आलेल्या भावाला परत पाठवू नका सासुबाई असे सांगतांना ती म्हणते-

*दिवायीनं मूय नका परतावा आत्याबाई*
*बहिनना बिगर भाऊ किलवाना जाई*

ही सासुरवाशीण बहिण दिवाळीला माहेरी आल्यावर तीला आई ,वडील, भाऊ, बहिणी असे सर्व गणगोत भेटते त्यामुळे घरात आनंदी वातावरण असते या आशयाच्या ओव्या पुढील प्रमाणे-

*माय दिवायी दसरा आते, दुखले ईसरा*
*आनन कराले सन नहीतवं दुसरा*

दिवाळीला शेतीच्या कामांची लगबग सुरु असते मात्र भावाला ओवाळायला दिवाळीसारखा दुसरा सण नसतो या आशयाच्या ओव्या पुढील प्रमाणे-

*दिवायी दसरा खेतीबाडीना पसारा*
*भाऊले ववायाले सन नहीसे दुसरा*

दिवाळी पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी भाऊबीज असते बहिण भावाला ओवाळते व त्या बदल्यात मला भरजरी साडी चोळी घेऊन दे असे

**ISSN 2277 - 5730**

**AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL**

# AJANTA

**Volume - IX** **Issue - II** **APRIL - JUNE - 2020**

**MARATHI PART - I**

## Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

**Journal No. 40776**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**

**2019 - 6.399**

**www.sjifactor.com**

**❖ EDITOR ❖**

**Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole**

M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

**❖ PUBLISHED BY ❖**

**Ajanta Prakashan**

Aurangabad. (M.S.)

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | मराठी संत कवयित्रींचे ामाजिक उत्तरदायित्व व वाङ्मयीन योगदान : एक चिकित्सा<br>**प्रा. डॉ. शोभा रोकडे** | ६४-७१ |
| १५ | संत साहित्यातील निसर्ग जाणिवा<br>**प्रा. डॉ. सुनिल भावराव देसले** | ७२-७६ |
| १६ | संत चळवळीतील स्त्री संतांचे योगदान<br>**प्रा. डॉ. तुषार गिरधर पटेल** | ७७-८४ |
| १७ | संत साहित्यातील संत कवयित्रिंचे स्थान<br>**डॉ. उज्वला पंकज नन्नवरे** | ८५-८९ |
| १८ | 'संत तुकाराम' आणि 'संत कबीर' यांच्या काव्यातील सृष्टी वर्णन<br>**श्री. अक्षय राजेंद्र भोसले**<br>**श्री. भगवान दिनकर गुरव** | ९०-९४ |
| १९ | श्री गोविंदप्रभु : विविध पैलूंचे व्यक्तिमत्व<br>**डॉ. मदकुंटे पी. एम.** | ९५-९८ |
| २० | संत साहित्यातील पर्यावरण विषयक जाणिवांचा शोध<br>**प्रा. डॉ. सुनीता सांगोले** | ९९-१०४ |
| २१ | संत तुकाराम महाराज यांच्या अभंगतील वैचारिकता<br>**डॉ. विनोद वा उपर्वत** | १०५-११० |
| २२ | संत तुकाराम यांच्या कवितेतील सामाजिकता<br>**प्रा. डॉ. वसुमती पाटील** | १११-११३ |
| २३ | समाज निर्मितीसाठी गोमंतकीय संत कवी संत सोहिरोबानाथ आंबिये यांची शिकवण<br>**श्री. आनंद आत्माराम कोळंबकर** | ११४-११८ |
| २४ | समाजनिर्मितीसाठी मराठी संतांची शिकवण<br>**डॉ. बन्सी केशवराव लव्हाळे** | ११९-१२४ |
| २५ | संत साहित्यातील संत कवयित्री<br>**प्रा. डॉ. गणेश चुधरी** | १२५-१२८ |
| २६ | संत साहित्यातील संत कवयित्री: विशेष संदर्भ संत कान्होपात्रा<br>**प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके** | १२९-१३३ |

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २६. संत साहित्यातील संत कवयित्रीः विशेष संदर्भ संत कान्होपात्रा

प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके
सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री - जि. धुळे.

## प्रस्तावना

महाराष्ट्र भूमी ही संतांची पावन भूमी आहे. येथे वैराग्याची परंपरा मांदलेली आहे. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि वाङमयीन परंपरेत संतांचे कार्य आणि महत्व अनन्यसाधारण आहे. सामाजिक अस्मितेचे व सांस्कृतिक ऐक्याचे संतच खरे शिल्पकार होत. तेराव्या शतकामध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांनी भागवत धर्माचा म्हणजेच वारकरी संप्रदायाचा पाया रचला आणि महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवली. संत नामदेवांनी आपल्या भावोएकटतेने, श्रद्धाबळाने आणि समर्पणशील वृत्तीने भागवत धर्माच्या पताकाखाली सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकत्रित आणले जातीभेदापलीकडे जाऊन समतावादी विचाराने एकत्रित आलेल्या वारकऱ्यांमध्ये भक्तीमधून स्नेहभाव रूजवला. आणि पंढरीच्या पांडुरंगाच्या प्रांगणात, चंद्रभागेच्या वाळवंटात अठरापगड जातीच्या वारकऱ्यांची मांदियाळी जमवून, वर्णाभिमान विसरून अध्यात्मिक लोकशाहीची प्रतिष्ठापना केली. रूढीग्रस्त अज्ञ जनांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला.. संत ज्ञानेश्वरांनी त्यांना खऱ्या खऱ्या धर्माचा अर्थ सांगितला. संपुर्ण समाज भक्तीच्या एका सूत्रात बांधला. भक्तीच्या क्षेत्रात कोणी श्रेष्ठ नाही, कोणी कनिष्ठ नाही, लहान-थोर, स्त्री-पुरूष, उच्च-निच्च सर्वांनाच भक्तीचा अधिकार असून भक्तीच्या बळावर इथे पापी माणसाचाही उद्धार होत असल्याचे सांगितले. देव भावाचा भूकेला असतो. त्याला जाती कुळाशी काही देघेघेणे नसते ही विचारसरणी मांडून अध्यात्मिक लोकशाहीचे, समतेचे बंधत्वाचे मर्म सांगितले हे सर्व संत ग्रामसंस्थेतील अलुतेदार-बलुतेदार होते. फार काही शिकलेले नव्हते. त्यांनी जमेल तसे आपले भाव देवापूढे निरूपण केले. प्रपंचात आलेले भलेबुरे अनुभव, व्यक्तिगत सुखदु:खे, समाजात होणारी उपेक्षा मुक्तीची आस, समतेचा ध्यास याचेच प्रतिबिंब त्यांच्या निवेदनात उमटलेले आहे. त्यांची भाषा साधी-सोपी-सरळ, रसाळ, अनलंकृत आणि हृदयाचा ठाव घेणारी आहे. उच्च जातीच्या संतांना जातीचा अभिमान नाही आणि हीन जातीच्या संतांनी जातीबद्दल कमीपणाही अनुभवला नाही. या भक्तीमार्गात सर्व स्तरातील आणि व्यवसायातील स्त्री-पुरूष एकत्र आलेत. संत ज्ञानेश्वरांपासून ते संत चोखामेळ्यापर्यंत आठरा पगड जातीच्या या संत पुरूषांसोबत संत मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, भागू, कान्होपात्रा यासारख्या स्त्रीसंतांचाही समावेश आहे. या सर्व संतांनी भक्तीभागेमध्ये आपापले योगदान दिलेले आहे. संत कान्होपात्रेचे जीवन भाग या सर्व संत कवी-कवयित्रींपेक्षा मला वेगळे जाणवल्यामुळे सदर निबंधातून त्यांचे स्मरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## संत कान्होपात्रा यांचा जीवन परिचय

पंढरपूरपासून २४ की.मी. अंतरावर असलेल्या मंगळवेढा या गावी कान्होपात्रेचा जन्म शामा नामक गणिकेच्या पोटी इ.स. १४६८ मध्ये झाल्याचे मानले जाते. अवघ्या तीस वर्षांचे आयुष्य तीला लाभले. गणिकेच्या पोटी जन्मल्याने तिला पित्याचे छत्र लाभले नाही. नाचगाण्याची कला कुळातच असलेली कान्होपात्रा तारूण्यात अधिकच सुंदर दिसू लागली होती

तीच्या रूपाची व नृत्यगायन कलेची कीर्ती चोहीकडे पसरली होती. आपल्या मुलीने आपल्यासारखेच गणिक व्हावे असे शामाला वाटत होते. तिच्या जीवाने आपलं श्रीमंती उपभोगू असा शामाचा मनोदय होता आणि तो मनोदय शामाने कान्होपात्रेस बोलून दाखवला मात्र तीला मान्य नव्हते. तीला आईप्रमाणे देहविकय करायचा नव्हता. कारण ती लहानपणापासूनच ती श्रीकृष्णाची भक्त होती. 'कै मी उद्धार पावेन । कै कृपा करील नारायण ।' अशी भक्तीची आर्तता तिच्या वृत्तीत होती. तीला अध्यात्मात रूजायचे होते. मात्र तीला आपण गणिकेच्या कुळात म्हणजे हीन कुळात जन्मल्यामुळे परमेश्वर आपली भक्ती मान्य करील काय? परमेश्वर आपणास प्राप्त होईल काय? आपला उद्धार करील काय? असे अनेक प्रश्न तीला सतावत होते तरीही ती कृष्धभक्तीत आपले जीवन व्यतित करते.

कृष्णभक्तीत तल्लीन असल्यामुळे तीला पंढरीच्या वारकऱ्यांची भजने ऐकण्याचा छंद लागला. त्यांच्याबरोबर तीही पंढरपूरास गेली. पांडुरंगाचे सावळे सगुण रूप पाहून तीला त्याचा लोभ जडला. ती पांडुरंगचे गुणगाण गाऊ लागली.

कान्होपात्रेच्या सौंदर्याची कीर्ती बिदरच्या राजाच्या कानावर जाते. राजा तीला आणण्यासाठी सैनिक पाठवतो. ते सैनिक तिच्यापुढे बादशहाच्या तारूण्याचे व वैभवाचे वर्णन करतात आणि आम्ही तुला राजाकडे घेऊन जाण्यासाठी आलो असल्याचे सांगतात मात्र तीला ते काहीही नको होते. तीला आपले चारित्र्य व शील जपायचे होते. पांडुरंगाच आपल्याला यातून मार्ग दाखवेल असा विश्वास तीला असलयामुळे ती मनोमनी विठ्ठलाच्या धावा करते स्वतःच्या आईपेक्षाही तीला पंढरीची विठाई, कृष्णाई, कान्हाई विश्वासाची वाटल असल्यामुळे ती त्या सैनिकांना सांगते की 'बिदरला येण्यापूर्वी मला पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे आहे. तुम्ही इथे बसा मी मंदिरात जाऊन येते. पांडुरंगाचा निरोप घेऊन येते.' आणि ती मंदिरात जाते दुवासन्मुख बसून ती पांडुरंगाला विनवनी करते त्याला त्याच्या ब्रिदाची आठवण करून देते अखेर तिची निस्सिम भक्ती पाहून पांडुरंग त्याच्या ब्रिदास जागतो आणि कान्होपात्रेचे संरसण करण्यासाठी तिचे प्राण स्वरूपात विलीन करून घेतो. तिची आत्मज्योत देवाच्या ज्योतीत एकरूप होते व तीचा अचेतन देह देवाच्या पायाशी पडतो.

अशा प्रकारे पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात आपले जीवन व्यतित करणारी, विठ्ठलाची अनन्यभावे भक्ती करणारी, यातीहीन अशा गणिका कुळात जन्मलेली कान्होपात्रा आपल्या भक्तीच्या बळावर संत पदास पोहचली.

**संत कान्होपात्रेची अभंग रचना**

संत कानेपात्रेचे २३ अभंग उपलब्ध असून ती विठ्ठल दर्शनाचा आनंद, विठ्ठल ब्रिदाची आठवण, यातिहीनतेची भावना, विठ्ठलाची आर्त याचना अशा अभंगरचनेबरोबरच उपदेशपर अभंगाची रचनाही तीने केल्याचे दिसून येते.

**विठ्ठल दर्शनाचा आनंद**

पंढरपूरच्या विठाईच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसोबत कान्होपात्राही विठ्ठल दर्शनास येते. मात्र माझ्यासारख्या यातिहीन भक्ताचा पांडुरंग स्वीकार करील काय? अशी प्रश्नवजा शंका तीच्या मनात येते मात्र विठ्ठलाचे दर्शन घेताच तीची शंका दूर होते व विठ्ठल दर्शनाने मनस्वी आनंदाची प्राप्ती येते –

"जन्मांतरीचे सुकृत आजी फळासी आले ।
म्हणोनी देखिले विठ्ठल चरण ।।"

जन्मोजन्मी केलेल्या सत्कृत्यांचे फळ आज मिळाले. विठ्ठल चरणाचे दर्शन घेण्याची आस आज पूर्ण झाली असल्याचे ती आपल्या अभंगातील सदर ओव्यांतून सांगते.

विठ्ठल ब्रिदाची आठवण :- संत कान्होपात्रा आपल्या पुढील अभंगातून विठ्ठलास त्याच्या ब्रिदाची आठवण करून देते-

"पतित पावन म्हणविसी आधी ।
तरी कां उपाधी भक्तामागे ॥१॥
तुझें म्हणवितां दुजे अंगसंग ।
उणेपणा सांग कोणाकडे ॥२॥
सिंहाचे भातुकें जंबुके पैं नेतां ।
थोरोचिया माथां लाज वाटे ॥३॥
म्हणे कान्होपात्रा देह समर्पणें ।
करावा जतन ब्रीदासाठी ॥४॥

वरील अभंगातून कान्होपात्रा विठ्ठलास त्याच्या ब्रीदाची आठवण करून देतांना म्हणजे हे विठ्ठला, तुझ्या भक्तांनी तुला 'पतितपावन' ही उपाधी दिलेली आहे. तू स्वतःलाही पतितपावन म्हणवतोस, भक्तांना आपले मानतोस मग मलाच का मदत करत नाहीस ? मग उणेपणा तुझ्याचकडे येणार. सिंहाचे खाद्य जर जंबुळ घेऊन गेला तर तो सिंहाचा अपमाण नाही का? तसेच मला बिदरच्या बादशहाने नेले तर तो तुझा अपमान होणार नाही का? म्हणून तू तूझे ब्रीद खरे करून दाखव. भक्ताचे रक्षा करून तुझे ब्रीद जतन कर.

यातीहीनतेची भावना :- संत कान्होपात्रा गणिकाकुळात म्हणजे हीन कुळात जन्मल्यामुळे आपली भक्ती पांडुरंग स्वीकारील काय? अशी चिंता तीला लागून राहते आणि म्हणूनच यातिहीनतेची भावना ती पुढी अभंगातून व्यक्त करते –

"दीन पतित अन्यायी । शरण आले विठाबाई ॥१॥
मी तो आहे यातीहीन । नकळे काही आचरण ॥२॥
मज अधिकार नाही । भेटी देई विठाबाई ॥३॥
ठाव देई चरणापाशी । तुझी कान्होपात्रा दासी ॥४॥

सदर अभंगातून कान्होपात्रा विठ्ठलास म्हणते की, यातीहीन असल्याने भक्ती मार्गावर कसे आचरण करावे हे मला कसे कळेल ? मला तो अधिकार नाही. विठाबाई तू मला भेट व माझी भक्ती स्वीकार. माझी करूना येऊ दे. मी तुझी दासी तुला शरण आलेली आहे अशी यातीहीनतेची भावना सदर अभंगातून कान्होपात्रा व्यक्त करते.

विठ्ठलाची आर्त याचना :- स्वतःच्या जन्मदायीकडूनच गणिकेचा वंशपरंपरागत व्यवसाय करण्याचा आग्रह कान्होपात्रेला होतो. मात्र तीला हे नको असते म्हणून ती विठूमाऊलीला पुढील अभंगातून याचना करतांना दिसते –

"जीवींचे जीवलगे माझे कृष्णाई कान्हाई ।
सांवळे डोळसे करूणा येऊंदे कांही ॥१॥

आला अपवाद याती संबंध लौकीक पाही ।
सांवळे डोळसे करूणा येऊंदे काही ॥२॥
दीनोद्धार ऐसे वेद शास्त्रें गर्जती पाही ।
सांवळे डोळसे करूणा येऊंदे काही ॥३॥
शरण कान्होपात्रा तुजला वेळोवेळां पाही ।
सांवळे डोळसे करूणा येऊंदे काही ॥५॥

संत कान्होपात्रा विठूमाऊलीत कृष्णाचे रूप पाहते व विनंती करते की, तू माझ्या जीवाची जीवलग आहे. तुला माझी कीव येऊ दे. मी हीन कुहातील असल्यामुळे भक्तीचा आधिकार नसलेली आहे. परमेश्वराला प्राप्त करून घेण्याचा अधिकार नसतांनाही मी तुझी आळवणी करते आहे.

वेद-शास्त्र पुराणात दीनोद्धाराला महत्त्व दिले असल्याचे लक्षात घेऊण तू माझी भक्ती स्वीकारली. माझा उद्धार करावा. मी तूला सदैव शरण आहे. आर्त याचना सदर अभंगातून कान्होपात्रा विठ्ठलाला करते.

उपदेशपरता :- विठ्ठलाला विनवणी करणाऱ्या, शरण जाणाऱ्या संत कान्होपात्रेने विणय वासनेच्या आहारी माणसाने जावू नये असा उपदेशही केलेला आहे. त्याचा प्रत्यय तीच्या पुढील अभंगातून येणे ----

"विणयाचे संगती । नाश पावले विश्चिती ॥१॥
भगें पडली इंद्राला । भस्मासूर भस्म झाला ॥२॥
चंद्रा लांगला कतंक । गुरूपलीसी रतला देख ॥३॥
रवण मुकला प्राणासी । कान्होपात्रा म्हणे दासी ॥४॥

सदर अभंगातून संत कान्होपात्रा उपदेश करते की, ज्या दुराचाऱ्यांची विषय-वासनेचा नाद घेतला त्या सर्वांचा नाश झाला. इंद्र, चंद्र रावण यांनी परस्त्रीची विटंबना केली. वासनेच्या आहारी गेले त्यामुळे ते नष्ट झाले म्हणून माणसाने विणय-वासनेच्या आहारी जावू नये.

वरील प्रकारे संत कान्होपात्रेच्या अभंगातून वेगवेगळे विषय हाताळल्याचे जाणवते.

**संत कान्होपात्रेच्या अभंगांची वैशिष्ट्ये**

१. संत कान्होपात्रेचे अभंग भक्तीने भरलेले, भक्तीरसात न्हालेले, अर्जनी असे आहेत.
२. संत कान्होपात्रेच्या अभंगात प्रेमभाव, करूणा, श्रद्धा, दास्यभाव, साफल्यभाव व्यक्त होतो.
३. विठ्ठलाची आर्तृता हा कान्होपात्रेच्या वाणीचा स्थायीभाव आहे.
४. संत कान्होपात्रेची अभंगरचना रसाळ, प्रासारिक असून भावार्थतेने ती ओतप्रोत आहेत.
५. संत कान्होपात्रेच्या अभंगातील रसार्द्रता व भावपरिपोष तिच्या त्यागमय जीवनाशी एकरूप होऊन प्रकट झाले आहेत.

**समारोप**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि वाङमयीन परंपरेत संतांचे कार्य अनमोल आहे. सामाजिक अस्मितेचे ते खरे शिलपकार असल्यामुळे त्यांनी खऱ्या अर्थाने समाज जडण-घडणीचा आलेख मांडला. सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्र आणून पंढरीच्या पांडुरंगाच्या प्रांगणांत आध्यात्मिक लोकशाहीची प्रतिष्ठापण केली. रूढीग्रस्त अज्ञ जनांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला. अभंग, कीर्तन, भारूड, प्रवचन आदि माध्यमातून लोकांना प्रबोधन व उपदेश केला. स्त्रीयांना आणि शुद्रातीशूद्रांना परमार्थाची दारे खुली करून दिली. या सकार्यात ज्ञानेश्वरादी पुरूण संतांसोबतच स्त्री संतांनी देखील भरीव कामगीरी केलीली आहे. त्या स्त्रीसंतांमध्ये यातीहीन अशा गणिका कुळात जन्मलेल्या संत कान्होपात्रेचे स्थान अढळ आहे.

**निष्कर्ष**

१. संतांची स्त्री-शूद्रांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखवून त्यांचे नैतिक बळ वाढवले.
२. सामाजिक जडणघडणीसाठी संतांनी अध्यात्मिक लोकशाहीचा मार्ग अवलंबला.
३. समाजातील वर्णभेद, उचनिचत्व, विषमता, कर्मकांड, अंधश्रद्धा, अज्ञान या गोष्टींवर संतांनी आपल्या अभंगवाणीने कोरडे ओढले.
४. संत कान्होपात्रेचे अभंग भक्तीने भरलेले असून तिची अभंगवाणी अर्जवी, करूणापर श्रद्धाळू, दास्यभाव, साफल्यभावपर आहे.
५. कान्होपात्रेचे अभंग तिच्या मनातील दुःखदभाव व उत्कट व्यथा यांचे दर्शन घडवणारे आहेत.
६. यातीहीन अशा गणिका कुळात जन्मलेली असतांनाही आपलया आर्तवाणीमुळे आणि निस्सिम भक्तीच्या बळावर कान्होपात्रा संत पदापर्यंत पोहचली आहे.

**संदर्भ**

१. बडवे सतिष –'साहित्याची सामाजिकता' –शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर पृ. १३ ते १७.
२. बागुल फुला –'बहुजनातील संत कवी कवयित्री' – अथर्व पब्लिकेशन्स जळगांव पृ. ४९ते५३.
३. घाटोळे रा.ना. –'मराठी वाङमयाचा इतिहास १८४० पासून आजपर्यंत' श्री मंगेश प्रकाशन नागपूर पृ.३३.
४. पाटील शिरीष (संपादक) 'संतांची अभंगवाणी मध्ययुगीन निवडक संत' प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव पृ. ८,९,४९ ते ५१.

drishtikon - UGC Care listed journal for Hindi

papers

Login

Drishtikon

conference paper

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

## *About Journal*

**Drishtikon** with **ISSN 0975-119X** is a multidisciplinary journal published in Hindi language. Articles from the fields of literature, commerce, arts, humanities, social studies, Hindi literature and others are published in Drishtikon Journal which is listed in **UGC care**. The **Drishtikon Journal** is published by

**Drishtikon** is a Hindi language multi-disciplinary UGC care listed journal for research publication. Published by Indexing and **editorial support from Eduindex. Send papers for publication to editor@eduindex.org**

Special Issue for a Conference Papers

**Published:** May 25, 2020

V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

# Articles

"हिंदी भाषा और वैश्वीकरण"

1-6

डॉ.अरुण घोगर

PDF

कृषी व ग्रामिण विकासावर जागतिकीकरणाचा परिणाम

7-12

प्रा.डॉ.अरुण उखा पाटील

भारतीयस्वातंत्र्य आंदोलनातील आदिवासी क्रांतीकाराकांचे योगदान : एक दृष्टीक्षेप

[illegible]-185 प्रा. एस. एस. धनगर

PDF

V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

हिंदी भाषा और वैश्वीकरण

186-195 डॉ. सौ. नयना प्रशांत पाटिल

PDF

जागतिकीकरण आणि मराठी कविता

196-207 डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके

PDF

हैद्राबाद मुक्तिसंग्रामात निजाम विजयचे कार्य

208-216 प्रा. डॉ. प्रशांत सुधाकरराव देशमुख

PDF

Drishtikon
(UGC Care Journal)

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

# जागतिकीकरण आणि मराठी कविता

डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके
मराठी विभाग प्रमुख
सी. गो. पाटील महाविद्यालय साक्री.
जि. धुळे

V.V.M.S's S. G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

Abstract:-

जागतिकीकरण आणि मराठी कविता या शोधनिबंधात जागतिकीकरण या संकल्पनेविषयी माहिती, नव्वदोत्तर कालखंडात उदयाला आलेल्या जागतिकीकरण खाजगीकरण आणि उदारीकरण ह्या त्रीसुत्रीचा समाजजीवनावर पडलेल्या प्रभावाबरोबरच मानवी संस्कृतीच्या बदलत्या स्वरूपाचे चित्र रेखाटलेले असून बदलते खेडे व महानगरीय जीवन-जाणीवा,माहिती आणि तंत्रज्ञानाचा प्रचंड वापर, बहुराष्ट्रीय कंपन्याचे वाढत जाणारे वर्चस्व, कृषीसंस्कृतीचा ऱ्हास,मानवी मूल्यांचे अवमूल्यन,चंगळवादी वृत्ती अशा सर्व बाबींचा मराठी कवितेवर कसा प्रभाव पडला ? तो मराठी कवितेतून कसा साकार झाला या संबधी विचार मांडलेला आहे,हे करतांना मराठी कवींच्या कवितेतील जागतिकीकरनाच्या बाबतीतल्या काही महत्वाच्या निवडक ओवी, त्यांचे विश्लेषण,समारोप,निष्कर्ष आणि संदर्भसूची देण्यात आलेली आहे.

बिजशब्द (Key Words) :- जागतिकीकरण संकल्पना, नव्वदोत्तर कालखंड, बदलते भावविश्व,महानगरीय जीवन,सायबर जग.

Copyright©authors

V.M.S.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

प्रस्तावना :-

विसाव्या शतकाच्या अखेरच्या कालखंडातील एक महत्त्वपूर्ण घडामोड म्हणून जागतिकीकरणाचा उल्लेख केला जातो.जागतिकीकरण,खाजगीकरण आणि उदारीकरण याविषयीची चर्चा १९९१ पासून होऊ लागली.जागतिकीकरण,खाजगीकरण प्रभाव जगातील सर्वच राष्ट्रांवर पडलेला आहे.आपल्या भारत देशातही तत्कालीन पंतप्रधान पीं.व्ही.नरसिंहराव व अर्थमंत्री डॉ.मनमोहनसिंग यांच्या पुढाकाराने भारताने नवे आर्थिक धोरण स्वीकारले.त्यात जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण ह्या त्रिसूत्रीचा स्वीकर करण्यात आला.जागतिकीकरण आज काळाची गरज बनली आहे. प्रवास साधनांच्या क्षेत्रातील क्रांती व माहिती तंत्रज्ञानाचा विस्फोट यामुळे संपूर्ण जग एकत्र  येणे अटळ बनले आहे.

जागतिकीकरणामुळे भांडवली अर्थव्यवस्था आणि आधुनिक जीवनमानाची नवी परिमाणे निर्माण झालीत.संपूर्ण जग हा एक मुक्त बाजारपेठ बनली.विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे नवनवे शोध आणि त्यांचा मानवी जीवनावरील प्रभाव वाढला.नवी विचार प्रणाली, बदलती मूल्यव्यवस्था  आणि विकासाचे नवे सिद्धांत यांचा  मानवी जीवनावरील प्रभाव वाढला.नवीन विचारप्रणाली, बदलते मूल्यव्यवस्था आणि विकासाचे नवे सिद्धांत यांचा मानवी जीवनावर प्रभाव पडू लागला. जागतिकीकरणात पैसा हा जगण्याचा मूलाधार बनला.पैसा मिळवण्यासाठी वाटेल त्या मार्गाचा मानस अवलंब करू लागली.त्यातून जगण्याची शैली बदलली.सुखवाद व चंगळवादाने माणसाला घेरले.जागतिकीकरण हे खाजगीकरणाला प्राधान्य देणारे असल्याने भांडवलदारांसाठी ही एक पर्वणी ठरली असून सर्वसामान्यांसाठी मात्र शाप ठरला आहे. जागतिकीकरण आज फक्त आर्थिक क्षेत्रापुरतेच मर्यादित न राहता सामाजिक, राजकीय,सांकृतिक व साहित्यिक क्षेत्र ही त्याने काबीज केले आणि ग्लोबल सांस्कृतिच्या नावाखाली संस्कृतीचे विकृतीकरण सुरु

Copyright@authors

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

झाले. पाश्चात्य वेषभूषेने आज संपूर्ण युवावर्गाला आपल्या कवेत घेतले आहे.संगीत व कला क्षेत्रासाठी संपूर्ण विश्व हे व्यासपीठ बनले आहे. या सर्व बाबींचा प्रभाव मराठी कवितेवरही पडलेला असल्यामुळे मराठीतील अनेक सर्जनशील व संवेदशील साहित्यिकांच्या लेखणीतून जागतिकीकरणाचा मानवी जीवनावर पडलेला प्रभाव आपल्या साहित्यात दिसून येतो. त्याला 'कविता' हा साहित्य प्रकारही अपवाद नाही.

**जागतिकीकरणाचा मराठी कवितेवर झालेला परिणाम :-**

नव्वदोत्तर कालखंडातील मराठी कवितेला जागतिकीकरणाचा संदर्भ आहे. माणसाच्या भाव-भावना-संवेदना,विचार,जीवनविषयक जाणीवा,नवी दृष्टी, नाते संबध आदि बाबींकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आणि हेच बदलते भावविश्व कवी सुनील अवचार,अरुण काळे, उत्तम कांबळे,महेंद्र भवरे,इंद्रजीत भालेराव, हेमंत दिवटे,मंगेश काळे,संतोष पवार,भुजंग मेश्राम,अशोक कोतवाल, अशोक इंगळे,श्रीकांत देशमुख,पी.विठ्ठल,प्रज्ञा लोखंडे,कविता महाजन,पद्मा गोळे आदि कवी कवयित्रींचं कवितांमधून पप्रकर्षाने प्रकटलेले आहे.

माहिती आणि तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले मात्र माणूस माणसापासून दूर जातो आहे. मानवी भाव-भावना-संवेदना बोथट झाल्या असून मानवी संस्कृतीचेही बाजारीकरण होत आहे.नव्या साम्राज्यशाही धोरणांच्या मायावी षडयंतत्रात महानगरे कशी सामील झाली आहेत हे बदलते भावविश्व कवी सुनील अवचारांनी आपल्या कवितेतून अचूक टिपले आहे.-

"या ग्लोबल वर्तमानात भावना झाली आहे जाहिरात

आणि मेंदूचे झाले आहे कॉम्पुटर,

Copyright©authors

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

तंत्रज्ञान झाले आहे युज अंड थ्रो

संस्कृती झाली आहे रखेल..."

महानगरीय जाणीवा बदलल्यामुळे जागतिकीकरणात मानवी भाव-भावनेला किंमत राहिलेली नाही.मानवी मेंदू कॉम्पुटर प्रमाणे वागतांना दिसतो. मात्र त्यामुळे माणसाचे तत्रज्ञान आज युज अँड थ्रो वाटू लागले आहे. या तत्राज्ञामुळे मानवी संस्कृतीची जांगा विकृतीने घेतली आहे.जणू ही संस्कृती बहुराष्ट्रीय कंपन्याची रखेल झाल्याचे कवीला वाटते.

कवी अरुण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' या कवितासंग्रहामधून जागतिकीकरणाचे प्रतिबिंब नेमकेपणाने प्रतिबिंबीत झालेले आहे.आपल्या कवितेत नव्या प्रतिमासृष्टीचा वापर करून 'खाउजा' संस्कृतीचे महाभयंकर संकट त्यांनी अधोरोलेखीत केले आहे.-

"जे बळी तुरुंगाच्या स्फोटाचे

तेच बळी माहितीच्या स्फोटाचे

हे बदललेले फॉर्म जातीय द्वेषाचे

हे विषाणू बहुजन हिताचा प्रोग्राम नष्ट करणारे

हे जागतिकीकरण" (नंतर आलेले लोक पृ.१२)

कवी अरुण काळे यांनी आपल्या कवितेत वरीलप्रमाणे संगणक क्रांती,तंत्रज्ञान युगाची परिभाषा योजून वर्तमानात माणूस संगणकाचा उपयोग मोठ्या प्रमाणवर करू लागला.मात्र याच संगणकीय

Copyright©authors

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

कार्यप्रणालीत प्रोग्राम नष्ट करणारा 'विषाणू' असल्याचे सांगून तो 'विषाणू' समान्य माणसाच्या हिताआड येणारा असल्याचेही म्हटले आहे.

कवी अशोक कोतवाल यांच्या कवितेने जागतिकीकरण लोकशाही आणि संस्कृती यांच्या बदलत्या स्वरूपाचे चित्र रेखाटले आहे. मधल्या सुटीत शाळेतून पळून जाणाऱ्या मुलांचे मन चित्रित करतांना कवी म्हणतात.-

"त्यांच्या लेखी शाळा होऊ शकत नाही! विरंगुळा

सायबर कॅफेतील

डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट कॉम व्हावी एक वेबसाईट शाळा"

(कुणीच कसे बोलत नाही पृ.२४ )

वर्तमान स्थितीत शाळेत शिकणाऱ्या मुलांचा कल शाळेऐवजी सायबर कॅफेकडे वळलेला आहे. कारण शाळेतील शिक्षणाच्या मनोरंजनापेक्षा सायबर कॅफेतील मनोरंजनात्मक शिक्षण मुलांना सहज अवगत होत असते म्हणून मुलांचा शाळेत जाण्याकडे ओढा निर्माण करण्यासाठी शाळाच एक वेबसाईट व्हावी अशी अपेक्षा कवी करतो.

कवी पी.विठ्ठल आपल्या कवितेतून महानगरीय जीवनाने एका विपरीत वळणावर मानवी जीवन आणून ठेवल्याचे तसेच संस्कृतीला निव्वळ मनोरंजनाच्या पातळीवर आणून ठेवल्याचे आणि हरवत चाललेल्या मानवी संवेदनांचे भाव व्यक्त करतात. पावलांचे ठसे,झाडाची सावली,गवताला फुटणारे कोवळे कोंब अशा मातीशी मानवाचे असलेले अतूट नाते सांभाळणाऱ्या गोष्टी नाहीशा झालेल्या आहेत असे

Copyright©authors

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule
ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

कवीला वाटते.मातीशी संवादी मानवी जीवनाचा आवाज ऐकू येत नाही म्हणून कवी व्यथित होतो आणि म्हणतो.-

"डोक्यावरून सळसळत धावतो फ्लायओव्हर

आणि गाडीच्या कर्णकर्कश

आवाजानं हृदयाचा सेन्सेक्स पार कोसळतो."

अशा प्रकारे कवीची अवस्था झाली आहे.महानगरीय भौतिक संपन्नतेतही अस्वस्थ असणारे हे कविमन महानगरीय जगण्याच्या सांस्कृतिक अंगोपांगाच्या नटव्या तऱ्हा पाहून अधिकच बेचैन झालेले आहे.-

"लेखक-बिखक,वही-पेन-पुस्तक

हवेयत कुणाला ?

हाउसफुल्ल मल्टीप्लेक्स, मॉल्स आणि

चायनीज डीशवर उडतोच पैशांचा पतंग"

महानगरीय जीवनाने संस्कृतीला निव्वळ मनोरंजनाच्या पातळीवर आणून ठेवल्यामुळे लेखक-बिखक, वही-पेन-पुस्तक हवेयत कुणाला? असा उद्विग्न प्रश्न कवी येथे उपस्थित करतो.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे घडून आलेला प्रचंड सामाजिक बदल आणि महानगरीय जीवन जाणिवेची घुसमट कवी महेंद्र भवरे आपल्या कवितेतून व्यक्त करतात.माहिती आणि तंत्रज्ञानाच्या प्रचंड

Copyright©authors

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

वापरामुळे महानगरीय जीवनात प्रचंड उलथापालथ घडून आलेली आहे.महानगरातला माणूस व्यक्ती केंद्रित बनला त्यामुळे त्याची नजर फायबर ग्लासाकडून सायबर जगाकडे वळलेली दिसते. इथे माणसाकडे ग्राहक म्हणून बघितले जाते त्यामुळे मानवी मूल्यांचे अवमूल्यन घडत असल्यामुळे या युगाला ते 'पत्थरदिल युग संबोधतात -

"फायबर ग्लास्कडून सायबर न्याहळणारी नजर

नपुंसक जगावर घालते दगड

पर्थरदिल युगाच्या आधुनिक वळणावर

थबकते जाग्यावर"

महानगरीय वास्तवामुळे मानवी जीवनात होणाऱ्या बदलांचा आणि त्यातील वेगवेगळ्या अवस्थांचा वेध कवी महेंद्र भावरे आपल्या कवितेतून घेतात.

कवी हेमंत दिवटेच्या कवितेतही महानगरीय जाणिवेचाच आविष्कार आहे. शहरी माणसाच्या गर्दीत माणुसकी सापडणे कठीण झाले आहे . चंगळवादी संस्कृती उदयास आली असून माणसाने आपल्या जीवन जाणीवा बदललेल्या आहेत.पप्रत्येक्ष वस्तूंपेक्षा वस्तूंच्या जाहिरातींवरच माणसाचा जास्त विश्वास आहे. म्हनूनच आपल्या कवितेत त्यांनी जागतिकीकरणातील जाहिरातींच्या भाषेचा अशश्रयाभिव्यक्तीसाठी चांगला वापर केला आहे 'मेगामॉल शॉपिंग' या कवितेतून त्याचा प्रत्यय येतो

"तर या मेगा शॉपिंग मॉलमध्ये शॉप करतांना

अतिमायक्रो विचार येत राहतात .........

Copyright©authors

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

ISSN 0975-119X
Vol-12-issue-7-2020
Special Issue

जसं की मी आहे पहिल्या रॅकमधला

व्हीसपर नॅपकीन पॅक

नेक्स्ट रॅकमधला हग्गीचा पॅक बनून मी

कुठल्याही बाळाचं मलमूत्र साचवून ठेवतोय"

(थांबताच येत नाही पृ.७)

याच कवितेत कवीने स्वतःला व्हीसपर नॅपकीन,हग्गीचा पॅक असे संबोधले असून आपण असाचवर्गीयांच्या उपभोगाची वस्तू असल्यची खंत व्यक्त केली आहे.

कवी उत्तम कांबळे यांनी जागतिकीकरणामुळे आर्थिक,समाजिक,सांस्कृतिक स्तरावर घडून येत असलेल्या दुष्परिणामापेक्षा कृषीसंस्कृतीवरझालेले दुष्परिणाम किती दूरगामी स्वरूपाचे आहेत ते त्यांच्या पुढील ओव्यांमधून जाणवते –

"शेताच्या काळजावरील

असंख्य भेगांवर अश्रू गाळत

बांधांवरून फिरणारी माझी कविता

जागतिकीकरणाच्या लाटेत

हातातून निसटणारी सबसिडी

गच्च पकडण्याचा प्रयत्न करीत होती."

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

(जागतिकीकरणात माझी कविता पृ.८८)

सदर ओळींमधून कवी उत्तम कांबळे यांनी जागतिकीकरणामुळे कृषीसंस्कृतीवर किती दूरगामी परिणाम झाले आहेत त्याचे वास्तव चित्रण केले आहे.

कवी अशोक इंगळे आपल्या कवितेतून जागतिकीकरणामुळे बदललेले नागरी वास्तव चितारतात.जागतिकीकरणामुळे ग्रामजीवनातही कसे परिवर्तन घडून येत आहे. आज खेडे बदलले आहे मात्र हे बदल मानवी नात्यांची घडी विस्कटून टाकणारे आहेत. ग्रामीण भागातही पैसे कमवण्याची जणू शर्यतच लागलेली आहे. कोणत्याका मार्गाने असेना पैसा आला पाहिजे असा ग्रामसमज निर्माण झालेला आहे.'गावाच्या ईस्टट प्रगतीसाठी' या कवितेत त्यांनी जागतिकीकरणामुळे ग्रामजीवनात कसे परिवर्तन झालेले आहे ते अतिशय मार्मिक शब्दात मांडलेले आहे.-

"आताशा गावाला जडलाय रोग

जमीन एन.ए.करून घेण्याचा .

प्लॉट पाडून विकण्याचा

पोल्ट्रीफॉर्म, धाबा टाकण्याचा इस्टट प्रगतीचा

महासत्तेच्या स्पर्धेत धावण्यासाठी गावाने पकडलाय वेग कालीपिलीचा

म्हणून गावाच्या उत्पनाचा आलेख झळकतो.

डिजिटल पोस्टर्सच्या होल्डिंगवर...."

Copyright©authors

Drishtikon
(UGC Care Journal)

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

(गावाच्या इस्टट प्रगतीसाठी काव्यसंग्रह 2013 पृ.६७)

अशा प्रकारे ग्रामजीवनातही स्वतःच्या काळ्या आईला (शेतीला)विकून त्या जागेवर प्लॉट पाडणे,हॉटेल टाकणे,पोल्ट्रीफॉर्म टाकणे आदि वेगवेगळ्या गोष्टीतून पैसा कमवण्याची चढाओढ चालल्याचे दिसून येते. मात्र गावाची ही प्रगती दिखाऊ असल्याचे कवी म्हणतात. कवी कालीपिलीच्या वेगाशी गावाच्या प्रगतीच्या वेगाची तुलना करतात. मात्र कालीपिली ही केव्हाही कुठेही बंद पडू शकते तसा गावाच्या विकासाचा वेगही केव्हाही मंदाऊ शकतो याचे सूचनाही कवी करतात.नुसत्याच पोष्टरवर फोटो झळकल्याने आपले कर्तृत्व सिद्ध होत नसल्याचेही ते सांगतात म्हणजे जागतिकीकरणामुळे ग्रामजीवनातही अशा प्रकारे बदल घडत असल्याचे उपहासात्मक मत कवी व्यक्त करतात.

समारोप :-

अशा प्रकारे नव्वदोत्तर कालखंडात उदयास आलेल्या जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण या त्रिसूत्रीचा समाजजीवनाबरोबरच मानवी संस्कृतीच्या बदलत्या स्वरूपाचे चित्र मराठी कवितेत रेखाटलेले असून गाव-शहरांचे बदलते स्वरूप, तेथील जीवन-जाणीवा,माहिती तंत्रज्ञानाचा प्रचंड वाढता वापर,बहुराष्ट्रीय कंपन्याचे वाढत जाणारे वर्चस्व,कृषीसंस्कृतीचा ऱ्हास, मानवी मूल्यांचे अवमूल्यन,तेथील एकाकीपणा,बोथट संवेदना, स्वार्थीवृत्ती,यांत्रिकता,मूल्यशून्यता,चंगळवादी वृत्ती,संस्कृतीचे बाजारीकरण,विकृतीकरण आणि सामाजिक बदलांचा वेध मराठी कवींनी आपल्या कवितांमधून समर्थपणे घेतला आहे.

निष्कर्ष :-

१) नव्वदोत्तर मराठी कविता ही जागतिकीकरणाच्या परिणामांचा वेध धेणारी कविता आहे.

Copyright©authors

Patil Arts, Sci. & Com. College
SAKRI,
Dist.Dhule
M.S.G.V.

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

२) जागतिकीकरणामुळे मराठी कवितेचे आशयविश्व बदलले.

३) मानवी मूल्य मुल्यांची घसरण व माणसा-माणसातील दुरावा यांचे वेधक चित्रण मराठी कवितेत चित्रित झालेले आहे.

४) विदेशी संस्कृती व सायबरचे जग यामुळे मानवी नवी पिढी उद्धस्त होण्याच्या मार्गावर असल्याचा इशारा मराठी कविता देत आहे.

५) जागतिकीकरणामुळे कृषीसंस्कृती,सामाजिक व सांस्कृतिक नितीमूल्य यांचे अस्तिव धोक्यात येत असल्याची जाणीव मराठी कवितेने अधोरेखित केली आहे.

संदर्भ :-

१) अवचार सुनील-'ग्लोबल वर्तमानाच्या कविता' दत्ता प्रकाशन अमरावती.पृ.९

२) Awachar Sunil- 'Poetry Against Human Injustice' पृ. १ ते ८

३) गोविलकर लीला- 'अनिवार्य मराठी' के.सागर पुबिकेशन्स पुणे. पृ.७३,७४

४) जाधव मा.मा.(संपा दक) 'अक्षरगाथा' ऑक्टोबर २०११ मधील. डॉ.अशोक इंगळे यांचा लेख पृ.43 ते 52

५) पाटील व्ही,बी.'मानवी हक्क' के.सागर पब्लिकेशन्स पुणे पृ. ३१५,३३८

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

६) सुरवाडे मोहन 'ग्रामीण साहित्य प्रकार स्वरूप आणि चिकित्सा' सुगम प्रकाशन अमरावती पृ. १८१ ते १८३

७) मराठी अभ्यास मंडळ कबचौ उमवि जळगाव (संपादन) 'काव्यांकुर'- प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव. पृ.५५,५६

८) वले वसुदेव (संपादक) 'जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव' मधील डॉ. अशोक इंगळे यांचा लेख पृ.२७४ ते २८१

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule

SAKRI, Dist.Dhule
V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College

भावाबहिणीमध्ये बऱ्याचदा छोट्या-छोट्या कारणांनी वितुष्ट निर्माण होत असते. बऱ्याचदा त्यांच्यात अबोलाही निर्माण होतो मात्र आपण चुकल्याचे भावालाही व बहिणीलाही कळाल्यावर भावाला पश्चाताप होतो तर बहिणीला रडायला येते हे ती पुढील ओव्यांतून सांगते -

*भाऊ बयनीन झगडं, झगडं चाले रानेवने*
*बयनीना डोये वनं पानी, भाऊ पस्ताई गया म्हणे*

बहिनीचे वय झाले आहे ती मरण्याच्या पंथाला लागलेली आहे तसा निरोप भावाला पाठवला जातो. भावालाही बहिणीच्या शेवटच्या भेटीची तळमळ लागलेली असते म्हणून बहिणींचा निरोप मिळताच भाऊ आपली बैलगाडी घेवून बहिणीच्या गावी पहाटे पहाटेच शुक्रतारा निघण्याच्या वेळेस पोहोचल्याचे वर्णन ती पुढील ओव्यातून करते -

*मना जीवले जड भारी, कागदे टाकू नाव*
*दादा तूना नंदी समरत, सूक (शुक्रतारा) निंघना मनी गाव*

बहिण मेल्यावर तीला शेवटची बोळावन (माहेरची साडी) भाऊच आणतो. मात्र ती बोळावन चांगली आण. तीला माझ्या गावातील आयाबाया पाहतील त्यांनी त्या बोळावनीला नाव ठेवायला नको. माझ्या माहेरचे नाव जायला नको. माहेरची आपकीर्ती व्हायला नको असे ती भावाला पुढील ओवीतून सांगते -

*निदाननी येये, धाव घालीसी भाऊराया*
*सरती बोयावन जोथी, मन्या नगरीन्या बाया*

अशा प्रकारे अहिराणी ओवीगीतातून भावा-बहिणीच्या प्रेमाचे, माया-ममतेचे सुख-दुःखाचे, राग-लोभाचे अशा विविध भावभावनांचे दर्शन घडते. ही ओवीगीते म्हणजे स्त्रीजीवनाचे एक अविभाज्य अंग होय. अंतरीच्या जीव्हाळ्यातून प्रकट झालेल्या ह्या ओवीगीतातून स्त्रीयांच्या उत्कट भाव-भावनांच्या सहज आविष्कार साकार होत असतो कारण ही ओवीगीते म्हणजे ग्रामिण स्त्रीयांच्या अनुभवाचे बोल असतात.


[redacted] ओव्यांची प्राप्ती

१. श्रीमती मंदोदराबाई श्रीराम साळुंके, रा. शेवाळी, ता. साक्री, जि. धुळे.

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

Scanned with CamScanner

2021



# बहिणाई

## अहिराणी काव्यसंग्रह

॥ एका एका कोंबातून, पर्गटले दोन पानं ॥
॥ जसे हात जोडीसन, टाया वाजवती पानं ॥

- बहिणाबाई चौधरी

अथर्व

V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule

अथर्व पब्लिकेशन्स

बहिणाई : अहिराणी काव्यसंग्रह
(Bahinai : Ahirani Kavyasangrah)

© सुरक्षित

P Book ISBN : 978-93-90288-86-1
पुस्तक प्रकाशन क्र. ७९६

प्रकाशक
युवराज भटू माळी
अथर्व पब्लिकेशन्स
धुळे : १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे - ४२४००१.
संपर्क : ९४०५२०६२३०
जळगाव : शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव - ४२५ ००१.
संपर्क : ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
ई-मेल : atharvapublications@gmail.com
वेबसाइट : www.atharvapublications.com

प्रथमावृत्ती : २६ जानेवारी २०२१
अक्षरजुळवणी : अथर्व पब्लिकेशन्स
मुख्य प्रेरणा व संकल्पना : प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे
मूल्य : १५०/-

**E-Book *available on***
**amazon.in ■ Pejbook.com ■ atharvapublications.com**

■ खानदेशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव नामविस्तार वर्धापन दिनानिमित्त 'खानदेशस्तरीय खुली ऑनलाईन अहिराणी काव्यवाचन स्पर्धा व काव्य संमेलन' यात सादर करण्यात आलेल्या अहिराणी कवितांचा काव्यसंग्रह

■ या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

- ओळख – विलास दगाजी सोनवणे ........................... ४८
- शेतकरी बापनं दुःख – विजय मोतीराम बागूल................. ४९
- दुरगा – विजय मोतीराम बागूल .............................. ५०
- शेतकरीनी कहाणी – डिम्पल सदाशिव जाधव ................ ५१
- म्हतारी माय – डिम्पल सदाशिव जाधव ....................... ५३
- माहेर – वनिता दिलीप नेरकर................................. ५५
- गाव – वनिता दिलीप नेरकर .................................. ५६
- कार्यकर्ता – देवदत्त दौलतराव बोरसे.......................... ५७
- अहिरानी मुजरा – देवदत्त दौलतराव बोरसे ..................... ५८
- पंढरीना राजा देव ईठ्ठल – प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंखे...... ५९
- करोना वुना भारत माता टेंशन मा शेना – रूपेश राजेंद्र माळी ... ६०
- मातू नका... – रूपेश राजेंद्र माळी ............................ ६२
- आख्खा जग ना बाप 'शेतकरी' – कु. भाग्यशा श्यामकांत नांद्रे.... ६३
- खेडामधलं जीवन – कु. भाग्यशा शामकांत नांद्रे ............... ६४
- दारुड्या – डॉ. डी. एस. सूर्यवंशी .............................. ६५
- ऐपत – डॉ. डी. एस. सूर्यवंशी ................................ ६६
- करोना.... – अश्विनी रवींद्र पवार .............................. ६७
- रणरागिनी – भावना वामन झाडगे.............................. ६८
- कोरोना – भावना वामन झाडगे ................................ ६९

## पंढरीना राजा देव ईठ्ठल

– प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंखे

पंढरीका जाऊ ईठ्ठल भाऊना कोनता वाडा
नामदेवनी पायरीवर जन्याबाई घाले सडा
पंढरीका जाऊ यंदा नही ना माझं मन
देव ईठ्ठलनी चिठ्ठ्या धाडील्या दोन
पंढरीका जाऊ पयला मुक्काम खाकोडीना
देव ईठ्ठलनी चिठ्ठी धाडी तातडीनी
पंढरी पंढरी ईठू रायानी नगरी
हाती तुयसीन्या माया नीत भरती गुजरी
चंद्रभागाले वना पूर वाही वनीका आरती
सोनानी आरती ववायू ईठ्ठलनी मुरती
पंढरी वसनी ईले वसाले नही जागा
टाय मुरदुंगनी भरी गई चंद्रभागा
रुकमीनी हाटेली गई तुयसीले मियूनी
तुयसाबाईन्या मंजोया खाली पडल्या गयूनी
कानुपातरानं झाड देव ईठ्ठलना मंदिरी
फुलेज गयथी रानी रुकमाना शेजारी
पंढरीका जाऊ संगे ल्हिवू मना सासरा
कोपरगावपासी भीमाबाईना पसारा
पंढरीका जाऊ संगे ल्हिवू मना जेटं
गाव गरसोयपासी चंद्रभागाले पानी रेटं
पंढरीला जाऊ संगे ल्हिवू मना देरं
गाव गरगोयपासूनी चंद्रभागानं पानी पीरं
पंढरीका जाऊ संगे ल्हिवू मनी सासू
पायज पडता देव ईठ्ठलले वनं हासू

---

**मनी नही भाव आणि देव माले पाव**

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

अथर्व पब्लिकेशन्स

# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण

Gender Equality and Women Empowerment

© सुरक्षित

ISBN : 978-93-87129-94-8

Book No. : 603

**प्रकाशक**

युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**

**धुळे :** १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे ४२४००१.

संपर्क : ९४०५२०६२३०

**जळगाव :** तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी, जळगाव ४२५००१. संपर्क : ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७

ई-मेल : atharvapublications@gmail.com

वेबसाईट : www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** २० ऑक्टोबर २०१८

**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स

**मूल्य :** ६९५/-

**ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

*निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथे दि. २० ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रातील निवडक लेख.*

*या पुस्तकात समाविष्ट लेखांचे हक्क ज्या-त्या लेखकांकडे असून त्यांच्या मताशी मुख्य संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.*



Scanned with CamScanner

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

• महिला सबलीकरण ........................................ १४३
  - प्रा. रमेश पावरा

• राष्ट्रीय विकास आणि महिला सबलीकरण .................. १४६
  - प्रा. रामेश्वर नारायण नगराळे

• भारतीय स्त्री सबलीकरण आणि स्त्रीचे जीवनमान ........... १५१
  - प्रा.डॉ. दुर्योधन देवीसिंग राठोड

• भारतीय राजकारणातील महिलांचा सहभाग आणि सक्षमीकरण... १५५
  - प्रा.डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे

• महिला आणि कायदेशीर संरक्षण ........................ १६१
  - प्रा. शामसिंग डी. वळवी

• बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील स्त्री जीवन दर्शन...... १६४
  - प्रा.एस.डी. पाटील

• साक्री तालुक्यातील अशिक्षीत स्त्रियांच्या अहिराणी ......... १७०
ओवीगीतातून प्रकट होणारे भावाबहिणीचे अतूट नाते
  - डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके

• महिला सबलीकरणात माध्यमांची भूमिका .................. १७५
  - स्नेहा साहेबराव राठोड

• स्त्री मुक्तीची आंदोलने आणि स्त्रीवादी साहित्य.............. १८१
यातील अनुबंध
  - प्रा.डॉ.एस.एस. पुलावळे
  - पाटील महेंद्र धोंडू

• महिला सबलीकरणामध्ये कथाकार प्रिया तेंडूलकरांचे ....... १८८
योगदान
  - डॉ. सुभाष सदाशिव पुलावळे

• मराठी साहित्यातील सक्षम लेखिका ...................... १९५
  - प्रा.डॉ. विजया पाटील

• महिला सक्षमीकरण व आर्थिक विकास .................... २०२
  - डॉ. वैशाली रा. हजारे



Scanned with CamScanner

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

# साक्री तालुक्यातील अशिक्षीत स्त्रियांच्या अहिराणी ओवीगीतातून प्रकट होणारे भावाबहिणीचे अतूट नाते

– डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके
मराठी विभाग प्रमुख, सी.गो.पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री, ता. साक्री, जि. धुळे

## प्रस्तावना

खानदेशात अहिराणी लोकगीतांची समृद्ध परंपरा असून लोकजीवनात प्रचलित असलेल्या मौखिक लोकगीतातून लोकजीवनाचे दर्शन घडते. 'ओवीगीत' हा खानदेशातील स्त्रियांचा भावसंपन्न ठेवा आहे आणि तो मौलिक ठेवा साक्री तालुक्यातील अशिक्षीत स्त्रियांनी आजही जतन केला आहे.

अहिराणी ओवीगीतातून स्त्रीजीवनाच्या विविध पैलूंचे प्रतिबिंब पडलेले आहे. त्यात आईवडीलांप्रमाणेच भावाबहिणीच्या नात्याला या ओवीगीतात विशिष्ट स्थान आहे. या नात्यातील पावित्र्य, कर्तव्य, सुख-दुःख, राग-लोभ, माया-ममता, वात्सल्य-आदरभाव, अशा विविध भावभावनांचा हृदयस्पर्शी अविष्कार अहिराणी स्त्रीगीतातून झालेला आढळतो. कौटुंबिक नात्यातील भावसंबंधाचे अत्यंत हळूवारपणे चित्रण या ओव्यांमध्ये केलेले असते. नात्यातील जिव्हाळा, मायेचा ओलावा व अंतरीच्या उमाळ्यातून या ओव्यांची निर्मिती झालेली असल्यामुळे त्या ओव्या आजही अशिक्षित स्त्रियांच्या मुखातून नकळत बाहेर पडतात.

भावाबहिणीचे अतूट नाते सुख-दुखाच्या प्रसंगी एकमेकांना आधार व मानसिक बळ देताना दिसते. बहिणीची रक्षा भावाने सदैव करावी, तीच्या गरिबीच्या परिस्थितीत तीला आर्थिक हातभार लावावा, विविध सण-उत्सवाला तीला माहेरी आणून साडी-चोळी-पैसे देवून तिची पाठराखण करावी. बहिणीलाही भावाबद्दल, त्याच्या बायको-मुलांबद्दल त्याच्या शेतीवाडीबद्दल, त्याच्या बैलांबद्दल फारच गोडी असते. रक्षाबंधन, भाऊबीजेसारख्या सणाला बहिण भावाला ओवाळून त्याचे औक्षण करुन देवाजवळ त्याला उदंड आयुष्य मागत असते व भाऊही तीच्या रक्षणाचे वचन देवासमक्ष तीला देत असतो. अशा प्रकारे भाऊ-बहिण एकमेकांच्या सुखी संसारासाठी देवाजवळ मागणे मागत असतात. अशा या भावा-बहिणीच्या पवित्र नात्याविषयी ग्रामिण भागातील अशिक्षीत स्त्रियांनी अहिराणी बोलीत विपून प्रमाणात ओव्या रचलेल्या आढळतात.

प्रस्तुत लेखात साक्री तालुक्यातील ग्रामिण अशिक्षीत स्त्रियांच्या ओवीगीतातून आपल्या भावाबहिणीविषयीचे विविध भावबंध उलगडून दाखविलेले आहेत. भाऊ आणि बहिण एकाच माय बापाची लेकर असल्यामुळे दोघांचा



Scanned with CamScanner

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

मेहरा-मोहरा दोघामधील गुण-दोष कसे सारखे असतात हे सांगताना ओवी गीतातील स्त्री म्हणते -

*आंगोई सारखा आंगोठा, आंगोई सारखा आंगोठा*
*मनी दिद्याबाईना सारखा, सामी दादाना मुखोटा*

भाऊ आता मोठा साहेब झाला आहे. तो विमानाने गावाला येत असतो असे ती पुढील ओव्यातून सांगते.

*सया संगातीनी गानं गाऊ बंदवाले*
*इवानना राजा भाऊ उतरना शेवाईले*

बहिणीचे लग्न झालेले आहे. ती भावाला सोडून सासरला गेलेली आहे म्हणून भाऊ एकटा पडलेला आहे. उदास झालेला आहे, हे सांगताना ओवीगीतातील स्त्री म्हणते.

*सोनं सवागी एक जागे, सोवं सवागी एक जागे*
*सवागे गई सासरे, सोनं फीकं फिकं लागे*

सदर ओवीतून भावाला 'सोन्या'ची तर बहिणीला 'सवागी'ची उपमा दिलेली आहे (सवागीमुळे सोन्याला अलंकारपण प्राप्त होते. पण सवागीचे अस्तीत्व मात्र उरत नाही ती सोन्यापासून अलग होत असते.) बहिणीचे लग्न झाल्यानंतरही बहिणीला भाऊ कशाचीही कमतरता भासू देत नाही. तीला अंतर देत नाही. तीचा मानसन्मान करतो. (दिवाळी, रक्षाबंधन, अक्षयतृतीया अशा सणांना तीला साडी-चोळी, दाग-दागीने, पैसे इत्यादी देत असतो) भाऊ बहिणीला तिच्या गावी भेटायला येतो तेव्हा तीला फारच आनंद होतो तेव्हा ती म्हणते -

*आंबानी कयरी, आंबाना देटले*
*दूरदेसना बंधू मना, वना बयनीना भेटले*

मात्र भाऊ लहान असल्यामुळे भावाने बहिणीचे गावही पाहिलेले नसते तेव्हा पाहुण्याचे नाव कुणाला विचारावे? असा प्रश्न भावाला पडतो तेव्हा ती गाण्यातून म्हणते -

*बयनीनं गाव नई मना बंधूनी दखेल*
*कमानी दरजा, नाव त्यावर सोयरानं लिखेल*

भावाचे व बहिणीचे गाव जवळजवळ आहे. बहिण भावाकडे जेव्हा येते त्यांची नजरानजर जेव्हा होते तेव्हा बहिणीच्या कडेवर असलेलं तीच लहान मूल आपल्या मामाकडे पाहून कसे हासते म्हणजे त्यालाही मामा दिसल्यावर कसा आनंद होतो हे ती बहिण पुढील ओव्यातून सांगते -

*मना गावपासी बंधू तूना गावना दिवा दिसे*
*भाऊ-बहिणीना नजरे एक, तरी मना कडेनं बाय हासे*



Scanned with CamScanner

भाऊ-बहिण एकत्र आल्यावर खूप गप्पा मारत असतात. एकमेकांचे सुख दुःख विचारत असतात वेगवेगळ्या प्रसंगांची आठवण होते तेव्हा खूप आनंद होतो त्यावर ती स्त्री म्हणते -

*भाऊ-बयनीन्या बोल्या, बोल्या व्हती परसंगन्या*
*घाल सिता दिवाले भरन (तेल) जोती जयती रेसमन्य*

बहिणीची परिस्थिती गरिबीची असल्यामुळे शेजारपाजारच्या आया-बाया तिला तिच्या गरिबीच्या परिस्थितीबद्दल विचारतात त्यावर ती त्यांना अतिशय समर्पक उत्तर देते -

*सेजीबाई सोदे, दुबयापननी हाकीगत*
*मातातरी पीता, चुनगजी पाया मजबूत*
*चुनगजी पाया दनदन, चुनगजी पाया दननद*
*बंधू मना झायात कमावता, आते कसानं दुबयपन*

बहिण भावाकडे आलेली आहे. तिची परिस्थिती गरिबीची आहे. तिच्या हातात सौभाग्याचं लेनं म्हणजे बांगड्या दिसत नाहीत ते पाहून भाऊ बांगड्या भरणाऱ्या कासाराच्या बैलगाडीला गावदरवाजातच थांबवतो व बहिणीला बांगड्या भरायला लावतो हे ती पुढील ओव्यातून सांगते -

*हात मना रीता, रीता हात कोनी दखा*
*वैराईना (कासार) नंदी, मना भाऊनी दरमाजा रोखा*

भाऊ बडोदा शहरात नोकरीला आहे. बडोद्याची बाजारपेठ मोठी आहे आणि बहिणीला लाल मखमली साडी (लुगडे) घेण्याची हौस आहे. ती बडोद्याला भावाकडे जेव्हा जाते भाऊ तीला बाजारपेठेत घेवून जातो. तेव्हा तीला आवडणाऱ्या लाल साडीचे वर्णन पुढील ओव्यातून करते -

*माले सेना हौस, लाल लुगडं उडद्यानी*
*माना बंधूनी बरोबर, पेट धुंडू बडोदानी*

भावाला पहिली मुलगी झालेली आहे असे बहिणीला समजल्यावर बहिणीला फार आनंद झालेला आहे. भाग्यवान पुरुषालाच पहिली मुलगी होत असते असे तीचे म्हणणे आहे. अहिराणी बोलीत त्यासंदर्भात पहिली 'कन्या नी दारसे दुन्या' अशी म्हणच प्रचलित आहे. ज्या माणसाला पहिली मुलगी होते तो भाग्यवान समजला जातो कारण मुलीच्या लग्नाच्या वेळेस सर्व नातेवाईक सगे-सोयरे, आप्तेष्ट आपल्या अंगणी येत असतात व अंगणाची शोभा वाढते याचे वर्णन ती पुढील ओवीतून करते -

*बारा पडतन पयरा गहू, तठे कथी नी मथी राई*
*बंधू भागना भाऊसाहेबले, दिद्या पयली कन्या झाई*



V.V.M.S's S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

Scanned with CamScanner

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

मुलीच्या पाठीवर भावाला मुलगा झालेला आहे. मुलाला (भाच्याला) पहायला येताना बहिणीने दाग-दागीणे, कपडे व विविध खेळणे आणलेले आहेत. तीला खूप आनंद झालेला आहे कारण या निमित्ताने ती माहेरी येणार, तिलाही भाऊ साडीचोळी घेणार, तिचा मान वाढणार हेही तिला माहिती आहे याचे वर्णन ती पुढील ओवीतून करते -

*भाऊले झाला लेक, पडं माहिती मयनाले*
*रंगीत पायना, साकयदंड जडीत घुंगरु खेयनाले*
*भाऊले झाया लेक, बहिनीले झाया भासा*
*सांगू सोनारले घड घागरी दुयरा फासा*
*भाऊले झाला लेक, माले भासरु म्हणायेनं*
*चोई-लुगडानं मनं, माहेर दुनायनं*

मात्र आपल्याला एकटाच भाऊ असल्याची बहिणीला खंत वाटते. मला अजून एखादा भाऊ पाहिजे होता असे तीला वाटते. भावाला एक जोडीदार झाला असता. मात्र तसे झाले नाही म्हणून ती देवाला सांगते की, हे देवा मला स्त्रीजन्मात घातल्यापेक्षा पुरुषाच्या जन्मास घातले असते तर माझ्या भावाबरोबरच वडीलांचा वंश वाढला असता असे ती पुढील ओवीतून सांगते -

*आरे आरे देवा, माले पुरुस घडता*
*मना बंधूनी बरोबर, मना आयबाना वसीला वाढता*

पुढे भावालाच व्याही करुन घेण्याची इच्छा बहिणीच्या मनात आहे. तसे केल्यावर जुने नाते नवे होईल व माहेरी येण्यासाठी हक्काचे घर होईल. आपला मान वाढेल असे तीला वाटते हे ती पुढील ओवीतून सांगते -

*गाव माहेरन्या गल्ल्या, गल्या लामनन्या*
*भाऊ करु यायी, पायघड्या रुमालन्या*

पण भावाला व्याही करु नकोस कारण आताच्या भावजया मान ठैवत नाहीत असे बाप तीला पुढील ओवीतून सांगतो -

*भाऊ करु यायी, बाप म्हणस नको बाई*
*आतेन्या भवजाया, मानमहिमा जुग्या नई*

आई-वडील जीवंत असतात तोपर्यंतच खऱ्या अर्थाने स्त्रीचे माहेरी येणं जाणं असतं ते मेल्यावर भाऊ-भावजय सुख-दुःखाचे चार शब्दही विचारायला तयार नसतात म्हणून बहिण आता माहेरी जास्त येत नसल्याचे ती पुढील ओवीतून सांगते -

*माय तवर माहेर, बाप तवर येनं-जानं*
*भाऊ-भवजाईनं राज, मी निटूर कयं मन*




Scanned with CamScanner

Academic Research (ISSN-2230-7796)

V.V.M.s' S.G. Patil Arts, S... SAKRI, Dist.Dhule

# आदिवासी लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती



Special Issue on National Seminar Sponsored by U.G.C. and Arts College, Bamkheda on the topic "लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती" on 29'th and 30th September 2016.

Vol - 11-No.1-Oct.-2016

संपादक : डॉ. सी. एस. करंके

Self Attested

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

# अणुक्रमणिका


| अ.नं. | शोधनिबंधाचे शिर्षक | लेखकाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| २४ | आदिवासी लोकगीतातील सौंदर्य | प्रा. मंगला एस. चौधरी | १३०-१३३ |
| २५ | आदिवासी लोकपरंपरा | प्रा. संजय शांताराम पाटील | १३४-१३९ |
| २६ | कोकणा आदिवास : सण - उत्सव एक अभ्यास | प्रा. कल्पना वासुदेव पाटील | १४०-१४२ |
| २७ | महाराष्ट्रातील आदिवासी जमातीचे सण-उत्सव | अभ्यासक कौतिक एन. दांडगे<br>डॉ. राजेंद्र धाये | १४३-१४५ |
| २८ | आदिवासी पावरा जमातीतील अंधश्रध्दा | डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके | १४६-१४८ |
| २९ | आदिवासी विवाह | प्रा. कांतीलाल दाजभाऊ सोनवणे | १४९-१५२ |
| ३० | आदिवासी लोककलाविष्कार | प्रा. उज्वला पाटील | १५३-१५९ |
| ३१ | महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचा कलाविष्कार नृत्यकला | डॉ. हिरालाल सोमा पाटील | १६०-१६२ |
| ३२ | आदिवासी लोककलाविष्कार - आंधाचे दिंडार | प्रा. विजय डी. झुंजारराव | १६३-१६५ |
| ३३ | आदिवासी टोकर कोळी जमातीच्या देव देवता | प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ | १६६-१७१ |
| ३४ | डोंगऱ्यादेव उत्सवाचे स्वरुप | प्रा. सुनिल भावराव देसले | १७२-१७५ |
| ३५ | आदिवासी लोकपरंपरा | प्रा. स्वप्नील प्रशांत गरुड | १७६-१८० |
| ३६ | आदिवासी गौडी दंडार | प्रा. नितीन जगदीश टेकाम | १८१-१८३ |
| ३७ | आदिवासी संस्कृतीतील कुलचिन्हांचे महत्व | डॉ. रजनी लुंगसे | १८४-१८९ |
| ३८ | आदिवासी कातकरी लोकांच्या परंपरा | डॉ.डी. ए. पाटील | १९०-१९२ |
| ३९ | आदिवासी जमातीचे धर्माचरण | प्रा. छाया व्ही. ठिगळे<br>प्रा. सविता एम. जावळे | १९३-१९५ |
| ४० | कोकणातील आदिवासी ठाकर जीवन व परंपरा सद्यस्थिती | डॉ. भटु गंगाराम वाघ | १९६-१९९ |
| ४१ | आदिवासी लोकोत्सव आणि ऋतुचक्र एक अनुबंध | डॉ. बी. एन. गिरासे | २००-२०३ |
| ४२ | काटवान परिसरातील भिल्ल आदिवासीचे बदलते जीवन आणि संस्कृतीचे निराळेपण | डॉ. वाल्मीक श. आढावे | २०४-२०७ |
| ४३ | खानदेशातील आदिवासीचे ग्राम दैवते | प्रा. रमाकांत चौधरी<br>डॉ. अनिता जाधव | २०८-२११ |
| ४४ | आदिवासी समाज व्यवस्थेतील स्त्री जीवन | अभ्यासक किर्ती राजाराम साबळे | २१२-२१४ |
| ४५ | आदिवासी स्त्री जीवनावरील साहित्य | प्रा. शरद तुकारंम आंबेकर | २१५-२२१ |
| ४६ | आदिवासी समाज व्यवस्थेतील स्त्री | अभ्यासक अंबिका अभिजीत विरकर | २२२-२२४ |
| ४७ | आदिवासी स्त्री : मिथक व वास्तव | डॉ. सिध्देश्वर नवलाखे | २२५-२२८ |
| ४८ | आदिवासी समाज व्यवस्थेतील स्त्री | डॉ. तुकाराम रोंगटे | २२९-२३४ |
| ४९ | आदिवासी समाज व्यवस्थेतील स्त्री जीवन | डॉ. विजय पाटील | २३५-२३७ |

Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

# * आदिवासी पावरा जमातीतील अंधश्रध्दा *

**प्रा.डॉ.प्रकाश श्रीराम साळुंके**
सी.गो. पाटील महाविद्यालय साक्री
ता. साक्री जि. धुळे

संपुर्ण मानवी समाज मग तो ज्ञानविज्ञानात्मक जाणिवा विकसीत झालेला नागरी वा पुढारलेला असो किंवा त्यापासून मैलोगणती दूर असणारा दुर्गातीदुर्गम अशा पहाड-पर्वतात, डोंगर-दऱ्यात, नदी-नाल्यात, झाडा झुडूपात राहुन उन-वारा-पावसाशी सतत संघर्षमय जीवन जगणारा आदिम समाज असो प्रत्येक मानवी समाजात थोड्याफार प्रमाणात अंधश्रध्दा विषयी खास अशा काही विशिष्ट संकल्पना असतात. ह्या सर्व संकल्पना माणसाचे वास्तव्य असलेल्या भूप्रदेशातील पर्यावरणात घडणाऱ्या घटणांशी व त्यांच्या संस्कृतिशी आणि धार्मिकतेशी निगडीत असतात, त्याला आदिवासी पावरा जमातही अपवाद नाही. त्यांचे संपूर्ण जीवन विविध श्रध्दा- अंधश्रध्दांनी व्यापलेले आहे. ते पुढील प्रमाणे सांगता येईल.

❖ **जादूटोना : -** आदिवासी पावरा जमातीत निसर्गपूजे एवढेच जादूटोण्याचे देखील अस्तीत्व आहे. जादूटोण्याला त्यांच्या जीवनात अनन्य साधारण महत्व आहे. जादूटोण्यावर त्यांचा परंपरागत विश्वास आहे. निसर्गातील अलौकिक शक्तींना नियंत्रीत करुन आपले हेतू साध्य करण्यासाठी ते जादूटोण्याचा वापर करतात. दुष्काळ, रोगराई, शत्रूच्या विनाशासाठी, शत्रूला नामशेष करण्यासाठी ते जादूटोण्याचा प्रयोग करतात. त्यांच्यात जादूचे दोन प्रकार आढळतात. एक म्हणजे ' पांढरी जादू' तिलाच चांगली किंवा 'विधायक जादू' असे म्हणतात. दुसरी म्हणजे ' काळी जादू' तीलाच वाईट किंवा 'विध्वंसक जादू' असे म्हणतात. पांढरी जादू त्यांच्यात श्रध्दास्थानी आहे. कारण तिचा वापर जनकल्याणासाठी, स्वकल्याणासाठी आणि संकट निवारण्यासाठी केला जातो. म्हणजे ही जादू समाजात उपकारक असते म्हणून पांढरी जादू ज्या भगतांकडे असते त्या भगतांना समाजात आदराचे स्थान असते. त्या भगतांना 'पुंजारा' किंवा 'बडूवा' असे म्हणतात. तर काळ्या जादूला 'अघोरी विद्या' असे म्हणतात. ते भगत अघोरी विद्येच्या सहाय्याने शत्रूवर मूठ मारणे, दुसऱ्यांच्या गाई - म्हशींचे दूध उडवणे, वेत बंद करणे, दुसऱ्यांवर करणी-कवटाळ करणे, एखाद्याच्या घरात कटकट घालणे, काळ्या कापडात बाहुलीच्या स्वरुपात दुश्मनाची प्रतीकृती तयार करुन त्या बाहूलीला सुया टोचून दुश्मनाच्या घरावर फेकणे, दुश्मनाच्या नावाने लिंबू, खारीक, खोबरे, अंडे मंत्रून स्मशानात फेकणे असे विनाशक कृत्य करीत असतात. ह्या सर्व अंधश्रध्दांची पाळेमुळे त्यांच्या जीवनात खोलवर रुजलेली आहेत. पावरा जामतीतील श्री कांड्या पाल्या पावरा ह्या जाणकाराने मुठ मारण्याचे काही प्रकार सांगतीले आहेत. ते पुढील प्रमाणे -

१) सुकी मुठ :- ही मुठ मारल्यानंतर माणूस हळूहळू वाळायला लागतो व मरतो.
२) लहरी मुठ :- ही मुठ मारल्यानंतर माणसाला चक्कर येतात.
३) जहरी मुठ :- ही मुठ मारल्यानंतर माणसाच्या अंगात जहर (विष) चढते.
४) फेहाटा मुठ :- ही मुठ मारल्यानंतर माणसाच्या तोंडातून फेस येतो.
५) कुयडी मुठ :- ही मुठ मारल्यानंतर माणसाचा घसा कोरडा पडतो.
६) रक्ती मुठ :- ही मुठ मारल्यानंतर माणसाच्या नाका तोंडातून, कानातून रक्तस्त्राव होतो.
७) उभाला मुठ :- ही मुठ मारल्यानंतर माणसाच्या सर्व शरीराचा दाह होतो म्हणजे आग होते.

❖ **भूत पिशाच्च :-** आदिवासी पावरा जामतीत भूत - पिशाच्च्या बद्दलही खूप अंधश्रध्दा ऐकायला मिळतात. श्री सुभाष पावरा यांनी भूतांचे वेगवेगळे प्रकार सांगीतले आहेत ते पुढील प्रमाणे "काल्या भुते, बगल्याभुते, चक्रीभुते, दगाऱ्या भुते, वेशार भूते, बिघाड भूते, देव भूते, मुसलमानी भूते, जहवणी, आसरावी, हणगी" इ. ही सर्व प्रकारची भूते माणसांना छळतात, त्रास देतात, आमावस्येच्या रात्री गावातील वडा-पिंपळाच्या झाडांवर बसलेले असतात. नदी नाल्यात वावरतात. रात्री गावात फिरतात यांच्या फेऱ्यात सापडलेल्या माणसांना मारुनही टाकतात, रात्री पायात



घुंगरु बांधून नाचत
गोल-गोल फिरवून
जंगलात तळहाता
बऱ्याचश्या अंधश्र
डाकन / चेटकी
असते. ती आमाव
बदलवते व रात्री
असा त्यांचा समज
देवांनाही त्रास देते.
आपले वय बदल
घाबरवते. बऱ्याच
माणसांशी भांडण
मारुन झोडून बाहेर
प्रथेच्या संदर्भात म
म्हणुन ठेचून मारले
गोंदणे : - पा
गोंदण्याची प्रथा अ
त्याच्या कपाळाव
कपाळावर गोंदल
कुठे हरवले किंव
व्यावहारीक कार
खानपानातील
त्यांच्या काही कु
ते खाद्यपदार्थ घर
सर्पाकृती पदार्थ
तरी आंधळी ज
मेलेल्या माणसा
पावसाच्या बा
पुढील प्रमाणे स
व दोन कुवार
कामड्या म्हण
दुष्काळाच्या क
ते थाळी वाजव
जवळ येऊ ल
एकमेकींवर च
तर ह्या वर्षी सु
तर ह्या वर्षी दु
त्यांच्यात अजू
पिछा सोडत न
वास्तव्यास अ

घुंगरु बांधून नाचतात. काही भूते चक्रिवादळात असतात. त्यात माणूस सापडल्यास त्याला उंच-उंच उडवतात व गोल-गोल फिरवून जमिनीवर आपटतात. काही भूते माणसांशी कुस्त्या खेळतात. तर काही आग्या-वेताळाच्या रुपाने जंगलात तळहातावर विस्तव घेऊन नाचतात व शेतातील लोकांना घाबरवतात. अशा प्रकारे भूतांबद्दलच्या बऱ्याचश्या अंधश्रध्दा पावरा जमातीत आढळतात.

**डाकन / चेटकीन / हडळ :** - ही दुष्ट स्त्री असते. ती आमावस्या - पोर्णिमेला घुमते तिच्याकडे अघोरी विद्या असते. ती आमावस्येच्या रात्री मारुतीच्या मंदिरात विवस्त्र जाते व सर्व गाव बांधते नंतर मांजर किंवा घुबड अशी वेश बदलवते व रात्री गावात संचार करते. तीच्या फेऱ्यात जो सापडला त्याला त्रास देते. लहान मुलांचे काळीज खाते. असा त्यांचा समज आहे. या डाकीणीबरोबर देवडाकणीचाही एक प्रकार ते सांगतात. ती डाकण माणसांबरोबर देवांनाही त्रास देते. ती केंव्हा तरुण मुलगी केंव्हा म्हातारी स्त्री, कधी लहान मुल बनून जोरजोरात रडते किंवा हसते. आपले वय बदलवून समवयस्कांमध्ये वावरते, माणसांना हाका मारते, मध्यरात्री गावात ओरडत फिरते व सर्वांना घाबरवते. बऱ्याचदा गावातील काही स्त्रियांना की ज्या स्त्रियांचे गावातील पाटील, पुंजारा किंवा अन्य प्रतिष्ठित माणसांशी भांडण वगैरे झाले किंवा त्या बाईवर संशय आला, तर सर्वांमिळून तिला डाकण ठरवून शिवीगाळ करुन मारुन झोडून बाहेरगावी हाकलून देतात नाहीतर मारुणही टाकतात. आदिवासी साहित्यिक श्री. वाहरु सोनवणे डाकण प्रथेच्या संदर्भात म्हणतात की," इतरांप्रमाणेच आदिवासींमध्येसुध्दा अंधविश्वास आहे. आदिवासी स्त्रीला डाकीण म्हणुन ठेचून मारले जाते."

**गोंदणे : -** पावरा जमातीतील स्त्री-पुरुषांमध्ये कपाळावर, गालावर, हनुवटीवर, कानांवर, हातांवर, बोटांवर, गोंदण्याची प्रथा आजही टिकून आहे. त्यातील अंधश्रध्दा म्हणजे जर का माणसाला गोंधले नाही, तर मेल्यावर देव त्याच्या कपाळावर सुई तापवून चटके देतो. या अंधश्रध्देमुळे न गोंदलेल्या स्त्री-पुरुषाला मेल्यावर देखील सुई तापवून कपाळावर गोंदल्यासारखा चटका ठेवतात. पुर्वी हातावर आपले नांव गोंदण्याची प्रथा होती. कारण स्त्री-पुरुष समजा कुठे हरवले किंवा कशाने मरण पावले तर त्या गोंदलेल्या नावामुळे त्यांचा शोध घेणे सोपे जात असे. हे एक व्यावहारीक कारण असावे. गोंदण्या प्रमाणेच कान टोचण्याचीही अंधश्रध्दा त्यांच्यात प्रचलीत आहे.

**खानपानातील अंधश्रध्दा :** - पावरा जमातीत खानपानाच्या बांबतीत देखील बऱ्याचशा अंधश्रध्दा आढळतात. त्यांच्या काही कुळातील लोकांना खाण्यातील बऱ्याच गोष्टी वर्ज्य असतात. म्हणजे त्यांच्यासाठी त्या अशुभ असतात. ते खाद्यपदार्थ घरी तयार केल्यावर किंवा खाल्ल्यावर घरावर संकटे येतात. असा त्यांचा समज आहे. तळलेले पदार्थ, सर्पाकृती पदार्थ ह्या वस्तू जर त्यांनी बनवल्या तर ते पुढील जन्मी आंधळे होतात. किंवा त्यांच्या घरात जन्मनारी मुले तरी आंधळी जन्मतात. असा त्यांचा समज आहे. विटाळशा स्त्रीच्या हातचे खाऊ नये. पाणीही पीऊ नये, तसेच मेलेल्या माणसाचा स्वयंपाक विधवा स्त्रीने किंवा विधूर पुरुषानेच करावा अशीही एक अंधश्रध्दा त्यांच्यात आढळते.

**पावसाच्या बाबतीतली अंधश्रध्दा : -** पावरा जमातीत पावसासंबंधीचीही अंधश्रध्दा आहे. श्री. भरत पावरांनी ती पुढील प्रमाणे सांगीतली. " पावसाळा सुरु होऊन देखील पाऊस पडत नसेल तर गावातील चौकात सर्व लोक जमतात व दोन कुवार मुलांना समोरासमोर ऊभे करुन त्यांच्या कमरेला बांबुच्या दोन-दोन कामड्या बांधतात. त्या दोन कामड्या म्हणजे एक सुकाळाची व एक दुष्काळाची. सुकाळाच्या कामडीच्या पुढच्या टोकाला पीठ लावतात व दुष्काळाच्या कामडीच्या टोकाला तव्यामागील काळे लावतात. त्या मुलांसोबत आणखी काही मुले माणसे असतात. ते थाळी वाजवतात व जोरजोरात सुकाल-दुकाल असे ओरडतात. थोड्या वेळाने त्या कामड्यांचे पुढचे टोक जवळ-जवळ येऊ लागते. तेव्हांही सुकाल-दुकाल असे जोरजोरात ओरडतात. त्या नंतर त्या कामड्या आपोआप एकमेकींवर चढतात. त्यावेळी जर सुकाळाच्या कामडीचे पुढचे टोक दुष्काळाच्या कामडीच्या पुढच्या टोकावर चढले तर ह्या वर्षी सुकाळ येईल आणि दुष्काळाच्या कामडीचे पुढचे टोक सुकाळाच्या कामडीच्या पुढच्या टोकावर चढले तर ह्या वर्षी दुष्काळ पडेल असे समजतात." अशी अंधश्रध्दा त्यांच्यात प्रचलीत आहे. तो त्यांच्या अनुभवही आहे.

वरील प्रकारे पावरा जमातीत फार मोठ्या प्रमाणात अंधश्रध्दा पाळली जाते. याचे कारण म्हणजे त्यांच्यात अजूनही पाहिजे तेवढे शिक्षणाचे प्रमाण वाढलेले नाही. अशिक्षीतता, अज्ञान व दारिद्र्य अजुनही त्यांच्या पिछा सोडत नाही.

थोडक्यात म्हणजे आदिवासी पावरा जमात ही आदिम काळापासून दुर्गातीदुर्गम अशा पहाडी भागात वास्तव्यास असल्यामुळे त्यांचे जीवन संघर्षमय झालेले आहे. तेथील पर्यावरणातील घडणाऱ्या वेगवेगळ्या घटणांशी



V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist. Dhule
Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

2017 pss

Maharashtra Political Science and Public Administration Conference

Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 4 No. : 3 Issue - 12 Sept.-Dec.2017 ISSN No. :2347-9639

34 Years

UGC Approved Journal No.64299


# VICHAR MANTHAN

IIJIF Impact Factor 2.283

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist. Dhule

## Human Rights and Challenges




महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

## मानव अधिकार आणि आव्हाने

मुख्य संपादक – प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे

संपादक – डॉ. प्रमोद पवार | डॉ. मनोहर पाटील

अथर्व

Scanned with CamScanner

- **Clean Environment as a Basic Human Right : A Dynamism of Indian Judiciary** ........... 86
  - Prof. S. S. Hasani
- **Human Right Education and Indian Constitution** ...... 89
  - Premlal N. Naik
- **Jhumpa Lahiri's 'The Treatment of Bibi Haldar' : A Misfit's Cry for Humanitarian Treatment** ..... 92
  - Dr. Darbarsing Dhansing Girase
- **Rights of Minorities in India** .................................... 95
  - Viqar R. Shaikh
- **Arundhati Roy's Novel 'The God of Small Things : A Human Rights Perspective'in Indian Perspective** ................ 98
  - Mr. Deepak D. Deore
- **भारतीय संविधानातील मानवी हक्कविषयक तरतुदी** .... १००
  - प्राचार्य डॉ. बाळ कांबळे
- **मानवाधिकार आणि महिला** ........................ १०४
  - प्रा. डॉ. मिरा विठ्ठलराव फड
- **मानवी हक्क** ........................................ १०६
  - प्राचार्य डॉ. मनोहर तुकाराम पाटील
- **आदिवासी आणि मानवी हक्क** ..................... १०७
  - प्रा. डॉ. संभाजी संतोष पाटील
- **मानव अधिकार : विश्व एवं भारत** ................. १११
  - डॉ. एस. के. गोयल
- **मानवाधिकार व महिला : अपेक्षा आणि वास्तव** ... ११३
  - प्रा. आबासाहेब माणिकराव देशमुख
- **मानवी हक्क, मुद्दे आणि आव्हाने (नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास)** ......... ११५
  - प्रा. पावरा अर्जुन जोरदार
  - प्रा. वसावे रामदास रमेश
- **आदिवासी आणि मानव अधिकार** .................. ११८
  - प्रा. श्रीमती नेरे अरुणा विजयकुमार
- **व्यक्तिस्वातंत्र्य व सामूहिक हिताचा समकालीन पेच** ... १२१
  - प्रा. भूषण प्रदीप अहिरराव
- **मानवाधिकार और भारतीय संविधान में अनुसूचित जनजातीयों के संवैधानिक मानवाधिकार** .... १२३
  - प्रा. छोटू एन. मावची
  - प्रा. डॉ. विजय तुंटे
- **मानवाधिकार आणि बालमजूर** ....................... १२५
  - प्रा. दिलीप हरसिंग राठोड
- **मानवाधिकारामधे पर्यावरणात्मक संबंध** ............ १२७
  - प्रा. दिपक भिला चौधरी
- **मानवाधिकार और बाल शिक्षा** ..................... १३१
  - डॉ. अनिता भीमराव काकडे
- **मानव अधिकार : आर्थिक व सामाजिक भूमिका** ..... १३३
  - प्रा. डॉ. अविनाश रामलाल निकम
- **दहशतवाद्यांना मानवी हक्क बंधनकारक नाहीत काय?** ............ १३६
  - प्रा. डॉ. देवेंद्र विसपुते
- **मानव अधिकार आणि दहशतवाद** ................. १३९
  - डॉ. दिनकर एस. कळंबे
- **रोहिंग्या मुस्लीम आणि मानवाधिकार** .............. १४१
  - प्रा. डॉ. गणेश द. गिरी
  - डॉ. किशोर सूर्यवंशी
- **मानव अधिकार आणि आदिवासी समाज : प्रश्न आणि आव्हाने** .......... १४३
  - प्रा. डॉ. एल. जी. पाटील
- **मानव अधिकार आणि आदिवासींच्या समस्या** ..... १४४
  - प्रा. डॉ. महेंद्र पाटील
- **मानवी हक्क आणि मूल्यशिक्षण** ..................... १४६
  - प्रा. डॉ. प्रकाश सरदारसिंग गिरासे
- **मानवी हक्क आणि आदिवासी समाज जीवन** ....... १४८
  - प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके
- **मानवी अधिकार आणि आदिवासी** ................ १४९
  - प्रा. डॉ. आर. जी. खैरनार
  - प्रा. आर. ए. वाघ
- **धुले शहर की सिंधी महिलाएँ : मौलिक अधिकार** .... १५१
  - प्रा. डॉ. संतोष शिवकुमार खत्री
- **मानवी हक्क आणि शैक्षणिक मूल्य** ................ १५३
  - प्रा. डॉ. सुनंदा वामनराव ठाकरे
- **लिंगभेद आणि मानवी हक्क** ....................... १५५
  - प्रा. डॉ. सुरेंद्र अंबर मोरे
- **मानवाधिकार एवम् महिलाएँ** ........................ १५७
  - प्रा. डॉ. विजय गजानन गुरव
- **मानवाधिकार आणि महिला** ........................ १५९
  - प्रा. कांतीलाल डी. सोनवणे
- **मानवी हक्क आणि महिला** .......................... १६१
  - प्रा. वळवी कवित्रा सिपू


V.V.M.S.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist. Dhule



Scanned with CamScanner

# मानवी हक्क आणि आदिवासी समाज जीवन

प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके
कला आणि वाणिज्य महाविद्यालय
अक्कलकुवा, जि. नंदुरबार

### प्रास्ताविक

मानवी हक्क हा प्रत्येक माणसाचा जन्मसिध्द हक्क असून समाजजीवनात मानवी हक्कांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवी हक्क प्रत्येक मनुष्याच्या अस्तित्त्वाशी निगडित असे मूलभूत हक्क आहेत. जीवनाचा विकास करण्यासाठी मानवी हक्कांची आवश्यकता असते. अअमानवी जीवन निर्भय बनविण्यासाठी मानवी हक्क उपयुक्त ठरतात. मानवी हक्क हे मानवतावादी लोकशाहीचे खरे तत्त्वज्ञान आहे. मानवी हक्कांव्दारे मानवाची प्रतिमा आणि प्रतिष्ठा उंचावण्याचा प्रयत्न केला जातो. आज प्रत्येक नागरिकाला मानवी हक्कांची प्राप्ती करण्याचा अधिकार आहे. हक्कांशिवाय माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला परिपूर्तता येऊ शकत नाही. प्रा. एच. जे. लॉक्सीच्या मते हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की, ज्याच्याशिवाय व्यक्तीला सामान्यत: स्वत:चा सर्वांगीण विकास करुन घेणे शक्य होत नाही. प्रा. बोंझाके यांच्या मते, आपण ज्या समाजाचे घटक असतो त्या समाजाच्या सर्वोच्च कल्याणाच्या दिशेने आपल्या जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे मानवी हक्क होय. तर टी. एच. ग्रीन यांच्या मते, मानवाच्या अंतरिक विकासासाठी आवश्यक असलेली बाह्य परिस्थिती म्हणजे हक्क होत. मानवी हक्क हा राजकीय तत्त्वज्ञानाचा अविभाज्य घटक आहे. जॉन लॉक हा मानवी अधिकारांचा प्रभावी समर्थक मानला जातो. जॉन लॉकने संपत्तीचा, स्वातंत्र्याचा व जीवन जगण्याचा या तीन अधिकारांचा समावेश मानवी हक्कामध्ये केला. लॉकच्या मते हे मानवी अधिकार निसर्गाची जन्मत: व्यक्तीला लाभलेली देणगी असून ते हिरावून घेण्याचा अधिकार कोणालाही नाही.

प्राचीन काळापासून मानव मानवी हक्कांचा वापर करीत आला आहे. मात्र, त्या काळात समाजात धर्मांधता ताठर असल्यामुळे मानवी हक्कांची कुचंबणा झाली. मध्ययुगीन काळात समाजात राजेशाही व सरंजामशाहीमुळे मानवी हक्क धोक्यात आले. मात्र, धर्मसुधारणा चळवळ, समाजसुधारकांचा उदय, औद्योगिक क्रांती, लोकशाही शासन पध्दती यामुळे मानवी हक्कांना महत्त्व प्राप्त झाले.

मध्ययुगीन काळात मानवी हक्कांचे समर्थक जॉन, लॉक, रुसो, मिल, लॉकी इ. पाश्चिमात्य विचारवंतांनी केलेले आहे. गौतम बुध्द, महावीर, सॉक्रेटीस, येशू ख्रिस्त, गॅलिलिओ, महात्मा फुले, राजश्री शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी आपले आयुष्य मानवी हक्कांसाठी खर्ची घातले. तर आधुनिक काळात सिंधुताई सपकाळ, अण्णा हजारे, मेधा पाटकर यांचे कार्य मानवी हक्काला प्रेरणा देणारे आहे. मात्र, स्वातंत्र्यानंतर भारतात आजही आपल्या हक्कांसाठी प्रत्येक समाजाला संघर्ष करावा लागत आहे. महिलांना संरक्षण नाही, बालकामगार, शेतकरी यांच्या मानवी हक्कांची पायमल्ली होत आहे. भारतीय समाज व्यवस्थेतील अशा अनेक घटकांपैकी आदिवासी जमातीलाही आपल्या हक्कांसाठी सतत संघर्षच करावा लागत आहे.

### आदिवासी समाज

आदिवासी समाज हा भारतीय समाजातील दुर्बल घटकांपैकी एक होय. आदिवासी समाजाला मूल निवासी, वनवासी, जंगलाचे राजे, आदिम जमाती, भूमिपुत्र अशा वेगवेगळ्या नावांनी संबोधले जाते. भारतीय राज्यघटनेत आदिवासी जमातींचा उल्लेख अनुसूचित जमाती असा करण्यात आला आहे.

आदिवासी समाज म्हणजे प्रगत समाजापासून अलिप्त असलेला दूर रानावनात व डोंगरदऱ्यात वास्तव्य करणारा आणि धर्म बोलीभाषा इ. बाबतीत समानता असलेला असा साधा सामाजिक समूह होय. गिलीन व गिलीन यांनी आदिवासी समाजाची एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारा, समान बोलीभाषा बोलणारा आणि समान संस्कृतीत जीवन जगणारा परंतु अक्षर ओळख नसलेला स्थानिक गटांचा समुच्चय म्हणजे आदिवासी समाज होय, अशी व्याख्या केली. तर डी.एन. मुजुमदार यांनी समान नाव धारण करणारा, एकाच मर्यादित भू-प्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा, विवाह, व्यवसाय इ. बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा आणि परस्पर उत्तरदायित्त्वाची एक पध्दतशीर व्यवस्था असलेला असा अनेक कुटुंबचा समुच्चय म्हणजे आदिवासी समाज होय, अशी व्याख्या केली आहे.

V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist. Dhule

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.